सहकार ◆ संघटन ◆ समर्पण

# मा. श्री. सतीशजी मराठे

## अमृत महोत्सव

१९ फेब्रुवारी २०२५, मुंबई



75

## सहकार सुगंध
## गौरव विशेषांक



संचालक , रिझर्व बँक ऑफ इंडिया

## आदरणीय श्री सतीशजी मराठे सर

अमृत महोत्सवी वर्षा प्रित्यर्थ **मनःपूर्वक शुभेच्छा !**

**धनंजय तांबेकर**
व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी अर्बन
संचालक, मॅफको

**सौ. राजश्री हेमंत पाटील**
अध्यक्ष,
गोदावरी अर्बन

**गोदावरी अर्बन**
**मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि. नांदेड**
**कार्यक्षेत्र :** महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, गुजरात, गोवा
Follow us on : www.godavariurban.com

**मुख्यालय :** 'सहकारसूर्य' एमएसईबी समोर, तरोडा नाका, पूर्णा रोड,नांदेड-४३१६०५.फोन:०२४६२-२६७२७७, ७७७५००५७७७
Email : officeadmin@godavariurban.com
**प्रशासकीय कार्यालय :** रिजेंट चेंबर्स, पहिला मजला, स्टेटस हॉटेलच्या वर, नरीमन पॉईंट, मुंबई -४०००२१

विश्वास तुमचा, जबाबदारी आमची !





माँ तेरी पावन पूजा में,
हम केवल इतना कर पायें...



**मा. श्री. सतीशजी मराठे अमृत महोत्सव सहकार सुगंध गौरव विशेषांक**

© सहकार भारती

**अमृत महोत्सव स्वागत समिती :**
श्री. सुरेश प्रभू (स्वागत समिती अध्यक्ष)
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. संजय पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. रमेश वैद्य
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता
श्री. राधेश्यामजी चांडक
श्री. गणेशराव गाडगीळ
श्री. सत्यनारायण लोहिया
श्री. किरण ठाकूर
श्री. ओमप्रकाश तथा काका कोयटे
श्री. पांडुरंग राऊत
श्री. मिलिंद काळे
श्री. सुभाष जोशी
श्री. शिरीष देशपांडे
सौ. वैशाली आव्हाडे
आ. प्रशांत परिचारक
आ. अतुल भोसले
डॉ. शांतीलाल सिंगी
श्री. प्रकाश नाईकनवरे
श्री. बी. बी. ठोंबरे
श्री. दत्ताराम चाळके

**गौरव विशेषांक संपादन :**
भालचंद्र कुलकर्णी,
संपादक, सहकार सुगंध
मो. : ९८२२८८२५०९

**प्रकाशन :**
माघ कृ. ६, शके १९४६
(छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती)
बुधवार, दि. १९ फेब्रुवारी २०२५

**(फक्त खासगी वितरणासाठी)**





॥ ॐ ॥

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

प्रधान कार्यालय : डॉ. हेडगेवार भवन, महाल नागपुर. 440 032
दूरभाष : 0712 – 2723003, 2720150. Email- sachivalay@sanghngp.org.in

सरसंघचालक : मोहन भागवत | सरकार्यवाह : दत्तात्रेय होसबाले

पौष कृ. 12 युगाब्द 5126 | 26.01.2025

सहकार भारतीचे संस्थापक सदस्य, बहुआयामी, कर्तृत्वसंपन्न, मा. श्री सतीश जी मराठे यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नियोजित 'सहकार सुगंध' च्या गौरव विशेषांकाचे प्रकाशन हा व्यक्तित्व आणि कृतित्व यांच्या अद्वैताचा अनुपम असा सुख सोहळा आहे.

सहकार भारतीचे संस्थापक सदस्य ते राष्ट्रीय अध्यक्ष हा प्रवास सहकार, संघटन, समर्पण या त्रिसूत्रीला जीवित कार्य मानणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा हा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा आहे.

उद्यमः साहसं धैर्यं बुद्धिः शक्तिः पराक्रमः ।
षडेते यत्र वर्तन्ते तत्र देवः सहायकृत् ॥

अर्थात ज्या व्यक्तीमध्ये परिश्रमाची पराकाष्ठा करण्याची तयारी असते तसेच साहस, धैर्य, बुद्धी, शक्ती, पराक्रम हे सहा गुण विद्यमान असतात त्या व्यक्तीला देव सुद्धा सहाय्यभूत होतात. सतीशजींच्या सार्थक जीवनामध्ये या सहा गुणांचे प्रतिबिंब आपणास अनुभवायला येते.

सतीशजींचे मोठेपण त्यांच्या विनम्रतेत आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे दर्शन घडवणाऱ्या आणि त्यांच्या जीवनप्रवासाचे यथार्थ वर्णन करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचे लेख, स्मृतिचित्रे याने विनटलेला सहकार सुगंध चा गौरव विशेषांक सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच अन्य सामाजिक संस्थांना प्रेरणा प्रदान करेल असा विश्वास आहे. सतीशजींना निरामय, सक्रिय, कर्मप्रवण, उदंड आयुरारोग्य लाभावे यास्तव ईश्वर चरणी प्रार्थना व या मंगल प्रसंगी त्यांचे अभिष्टचिंतन.

गौरव विशेषांकाच्या प्रकाशनार्थ प्रयासरत शब्दशिल्पी संपादक मंडळाचे हार्दिक अभिनंदन एवं शुभकामना.



मोहन भागवत



हरिभाऊ बागडे
राज्यपाल, राजस्थान



सत्यमेव जयते

Haribhau Bagde
Governor, Rajasthan

दिनांक : 23 जनवरी, 2025

## संदेश

मुझे यह जानकर प्रसन्नता हुई है कि सहकार भारती के संस्थापक सदस्य, पूर्व राष्ट्रीय अध्यक्ष एवं रिजर्व बैंक के वर्तमान निदेशक माननीय श्री सतीश जी मराठे के अमृत महोत्सव वर्ष पर 19 फरवरी, 2025 को मुम्बई में पूर्व सरकार्यवाह माननीय भैयाजी जोशी की उपस्थिति में सार्वजनिक अभिनंदन समारोह हो रहा है।

माननीय श्री सतीश जी मराठे से मेरे निकट के संबंध रहे है। उनका व्यक्तित्व और कृतित्व सहकार क्षेत्र के लिए ही नहीं मानव कल्याण के विभिन्न क्षेत्रों में अनुकरणीय रहा है। जो अपने लिए नहीं सदा दूसरों के लिए सेवा भाव से कार्य करते हैं, मानवता के लिए अपना जीवन होम करते है, वहीं सार्थक जीवन जीते हैं। माननीय श्री सतीश जी मराठे ऐसे ही है। विश्वास है उनके जीवन आलोक में प्रकाशित हो रहे 'सहकार सुगंध' के विशेष अंक में प्रकाशित सामग्री उनके व्यक्तित्व के विभिन्न आयामों से पाठको को प्रेरणा देने वाली होगी।

माननीय श्री सतीश जी मराठे के जीवन के अमृत महोत्सव पर हार्दिक शुभकामनाएं। वे स्वस्थ, प्रसन्न रहें और दीर्घायु हों।

मेरी स्वस्तिकामना है।

(हरिभाऊ बागडे)

राज भवन, सिविल लाइन्स, जयपुर–302006
Raj Bhawan, Civil Lines, Jaipur-302006
दूरभाष : 0141–2228716–19, 2228611–12, 2228722



अमित शाह



सत्यमेव जयते

गृह मंत्री एवं सहकारिता मंत्री
भारत सरकार

## संदेश

मुझे यह जानकर अत्यंत प्रसन्नता हो रही है कि सहकार भारती के संस्थापक सदस्य और देश के सहकारिता आंदोलन में अग्रणी भूमिका निभाने वाले **श्री सतीश मराठे जी** के 75 **वर्ष** की आयु पूर्ण होने के अवसर पर सार्वजनिक अभिनंदन समारोह का आयोजन एवं इस अवसर पर सहकार भारती की पत्रिका **'सहकार सुगंध'** के विशेषांक का प्रकाशन भी किया जा रहा है।

भारतीय सहकारिता आंदोलन में श्री सतीश मराठे जी का योगदान उल्लेखनीय है। आज समाज के हर वर्ग को आर्थिक रूप से सशक्त बनाने में सहकारिता के सिद्धांत अपनी महत्तवपूर्ण भूमिका निभा रहे हैं। श्री सतीश मराठे जी के नेतृत्व और दूरदृष्टि ने सहकारिता को केवल आर्थिक सशक्तिकरण का साधन ही नहीं, बल्कि सामाजिक समावेशन का एक मजबूत आधार भी बनाया है। उन्होंने बैंक ऑफ इंडिया से अपनी बैंकिंग यात्रा प्रारंभ की और यूनाइटेड वेस्टर्न बैंक लिमिटेड के चेयरमैन व जनकल्याण सहकारी बैंक लिमिटेड के सीईओ के रूप में उत्कृष्ट कार्य किया।

सहकारी क्षेत्र में अध्ययन और शोध को बढ़ावा देने हेतु सतीश जी ने **"सेंटर फॉर स्टडीज एंड रिसर्च इन को-ऑपरेशन** (CSRC)" की स्थापना की। वर्तमान में वे रिजर्व बैंक ऑफ इंडिया के केंद्रीय बोर्ड, नेशनल हाउसिंग बैंक, तथा नई सहकारी नीति मसौदा समिति में महत्वपूर्ण पदों पर कार्यरत हैं।

श्री मराठे जी ने हमेशा सहकारिता को समाज के अंतिम व्यक्ति तक समृद्धि पहुँचाने का एक प्रभावी माध्यम माना है। सरकार के निरंतर प्रयासों और श्री मराठे जी जैसे अनुभवी मार्गदर्शन के चलते सहकारी क्षेत्र को वर्तमान की आवश्यकताओं के अनुरूप सशक्त किया जा रहा है। **माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी जी** के नेतृत्व में चाहे **"सहकारिता मंत्रालय"** की स्थापना हो, सहकारी संस्थानों को नवीन आर्थिक अवसरों और तकनीकी पहल के साथ जोड़ना हो या सहकारी बैंकिंग को नए युग के अनुकूल बनाना हो, आज देश **'सहकार से समृद्धि'** का स्वर्णिम कालखंड देख रहा है।

मैं अभिनंदन समारोह के सफल आयोजन और विशेषांक के सफल प्रकाशन की कामना करते हुए ईश्वर से उनके स्वस्थ और सुदीर्घ जीवन की प्रार्थना करता हूँ।

*न हीदृशं संवननं त्रिषु लोकेषु वर्तते।*
*दया मैत्री च भूतेषु दानं च मधुरा च वाक॥*

(अमित शाह)

डॉ. उदय जोशी,
अध्यक्ष, मा. श्री सतीश जी मराठे अमृत महोत्सव समिति

कार्यालय : गृह मंत्रालय, नॉर्थ ब्लाक, नई दिल्ली-110001
दूरभाष : 23092462, 23094686, फैक्स : 23094221
ई-मेल : hm@nic.in



नितीन गडकरी
NITIN GADKARI



सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways
Government of India

D. O. NO. 06
DATE 05 FEB 2025

**शुभेच्छा**

सहकार भारतीचे संस्थापक सदस्य आणि माजी अध्यक्ष तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे विद्यमान संचालक श्री. सतीश मराठे यंदा वयाची पंच्याहत्तरी पूर्ण करीत आहेत. श्री. मराठे हे माझे स्नेही आहेत. त्यांच्याशी माझे ४५ वर्षांचे ऋणानुबंध आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी उत्तम काम केले. या कामातून त्यांच्यातील कार्यकर्ता घडला. इतरांच्या घडवणुकीत त्यांनी योगदान दिले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक समर्पित स्वयंसेवक आणि विचार परिवाराकरिता काम करणारा एक कार्यकर्ता म्हणून त्यांचे व्यक्तिमत्व घडले. विद्यार्थी परिषदेच्या कामात त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते. त्या काळात मा. मदनदासजी, यशवंतराव केळकर, बाळासाहेब आपटे यांच्यासोबत मुंबई विभागात, महाराष्ट्रात त्यांनी विद्यार्थी परिषदेचे कार्य केले.

त्यांच्यावर बँकिंग क्षेत्रात काम करण्याची जबाबदारी आली. ती देखील त्यांनी उत्तमरीत्या पार पाडली. युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. युनायटेड बँकेचे अध्यक्ष असताना नागरी सहकारी बँकिंगच्या क्षेत्रात कोणत्या सुधारणा होण्याची गरज आहे, याचा त्यांनी अभ्यास केला. पुढच्या काळात त्यांनी सहकार भारतीचे काम केले. सहकार क्षेत्रात अर्बन को–ऑपरेटिव्ह, क्रेडिट सोसायटी, कन्झ्युमर सोसायटी यांचेही त्यांनी सूक्ष्म अध्ययन केले. याच अध्ययनाच्या माध्यमातून त्यांनी सहकार चळवळीला दिशा देण्याचा प्रयत्न केला. नंतर त्यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. तिथेही त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला.

निस्पृह, नि:स्वार्थी आणि संघ विचारांशी कटिबद्ध असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. आम्ही साखर कारखाना सुरू केला, तेव्हा श्री. मुकुंदराव पणशीकरांनी त्यांना सांगितले की, आपल्या लोकांचेही कारखाने उभे झाले पाहिजेत. ते लक्षात घेऊन त्यांनी मोठया प्रमाणात कारखान्याकरिता अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकांना एकत्र केले. आम्हाला कर्ज मिळवून दिले. खरे तर त्या कठीण काळात साखर कारखान्याला कर्ज देणे बंद झाले होते. पण श्री. सतीश मराठे यांनी त्यातूनही मार्ग काढत आम्हाला कर्ज दिले. त्यामुळे आमचा कारखाना उभा झाला. त्यांचे ऋण आम्ही कधीही विसरू शकत नाही. अशा अनेक लोकांना त्यांनी सातत्याने मदत केली. त्यामुळेच हरिभाऊ बागडे आणि माझ्यासारख्यांना कार्यकर्त्यांना या क्षेत्रात उत्तम काम करण्याची संधी मिळाली.

मा. सतीशजीं सारख्या एका समर्पित कार्यकर्त्यांचा अमृत महोत्सव समितीच्या वतीने आपण गौरव करीत आहोत, ही आपल्या परिवाराकरिता अभिमानाची गोष्ट आहे. त्यांनी आपल्या आयुष्याची यशस्वी ७५ वर्षे पूर्ण केली आहेत. त्यांचा जीवनप्रवास आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.'सहकार सुगंध' या सहकार भारतीच्या मुखपत्राचा विशेषांक त्यांच्या अमृतमहोत्सवी गौरवानिमित्त काढला जाणार आहे. त्यातून पुढच्या पिढ्यांना प्रेरक असे विचार मिळतील, असा मला विश्वास वाटतो. सतीशजींना समाजाची सेवा करण्याकरिता, सहकार क्षेत्रात उत्तम काम करण्याकरिता परमेश्वराने दीर्घायुष्य द्यावे, हीच प्रार्थना.

( नितीन गडकरी )

Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: (RTH) 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F)
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in
Camp Office Nagpur : Plot No. 25, Opp. Orange City Hospital, Beside Jupiter School, Khamla Chowk, Nagpur-440015(MS)
Tel.: 0712-2239918/20/22/23/24 Email : office@nitingadkari.net



सत्यमेव जयते


## देवेंद्र फडणवीस



मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२


दि. ११ फेब्रुवारी, २०२५

# शुभेच्छा

सहकार भारती संस्थापक सदस्य तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक श्री. सतीशजी मराठे वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत असल्याचे समजून आनंद झाला. श्री. मराठे यांचे अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मन:पूर्वक अभिष्टचिंतन! हे अमृत महोत्सवी वर्ष श्री. मराठे यांच्यासाठी सुख, समाधान आणि उत्तम आरोग्य घेऊन येवो, ही सदिच्छा!

आदरणीय श्री. मराठे यांनी अ. भा. विद्यार्थी परिषदेमध्ये अनेक वर्षे विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांनी बँकिंग आणि सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. सहकार भारतीच्या स्थापनेपासून काम करत त्यांनी राष्ट्रीय महामंत्री, अध्यक्ष अशा महत्त्वपूर्ण पदांची जबाबदारी समर्थपणे सांभाळली आहे. युनायटेड वेस्टर्न बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा देखील त्यांनी सांभाळली आहे. ते सध्या रिझर्व्ह बँकेबरोबरच नॅशनल हौसिंग बँकेचे संचालक, स्व. लक्ष्मणराव इनामदार सहकार संशोधन आणि विकास राष्ट्रीय प्रबोधिनीचे उपाध्यक्ष, प्रगती प्रतिष्ठानचे विश्वस्त अशा विविध जबाबदाऱ्या देखील ते सांभाळत आहेत.

श्री. मराठे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित होत असलेला 'सहकार सुगंध'चा गौरव विशेषांक त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या आणि संस्थात्मक कार्यावर प्रकाश टाकणारा, या क्षेत्रात कार्यरत अनेकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आहे. या गौरव विशेषांकासाठी तसेच मा. श्री. सतीशजी मराठे अमृत महोत्सवी समितीतर्फे आयोजित सत्कार सोहळ्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)


दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in,
वेब साईट : www.maharashtra.gov.in



धर्मेन्द्र प्रधान
ଧର୍ମେନ୍ଦ୍ର ପ୍ରଧାନ
Dharmendra Pradhan

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

शिक्षा मंत्री
भारत सरकार
Minister of Education
Government of India



## संदेश

मुझे यह जानकर हार्दिक प्रसन्नता है कि **मा. श्री सतीशजी मराठे अमृत महोत्सव समिति, सहकार भारती** द्वारा सहकार भारती के संस्थापक सदस्य एवं पूर्व राष्ट्रीय अध्यक्ष और भारतीय रिज़र्व बैंक के वर्तमान निदेशक **मा. श्री सतीशजी मराठे** की 75वीं वर्षगाँठ के शुभ अवसर पर एक भव्य समारोह का आयोजन किया जा रहा है। इस अवसर पर, सहकार भारती अपने मुखपत्र 'सहकार सुगंध' के विशेष अंक का प्रकाशन भी करने जा रहा है। मैं सतीशजी की 75वीं वर्षगाँठ पर हृदय की अतल गहराइयों से हार्दिक बधाई देता हूँ और उनके स्वस्थ, सुदीर्घ एवं मंगलमय जीवन की कामना करता हूँ।

कुशल अर्थचिंतक, अपूर्व संगठनकर्ता, शिक्षाविद् एवं प्रखर चिंतक श्री सतीशजी मराठे ने विद्यार्थी जीवन से लेकर वर्तमान में मिले दायित्वों का सफलतापूर्वक निर्वहन किया है और आगे आने वाली पीढ़ियों के लिए प्रेरणास्रोत हैं। कई वर्षों तक अखिल भारतीय विद्यार्थी परिषद् (एबीवीपी) में विभिन्न जिम्मेदारियाँ संभालने वाले सतीशजी ने बैंकिंग और सहकारी क्षेत्र में उल्लेखनीय काम किया है। 1978 में सहकार भारती की स्थापना के बाद से उन्होंने राष्ट्रीय महासचिव और राष्ट्रीय अध्यक्ष जैसे सर्वोच्च पदों पर भी कार्य किया है। वर्तमान में आरबीआई एवं नेशनल हाउसिंग बैंक के निदेशक के साथ और भी कई जिम्मेदारियाँ संभाल रहे हैं।

सतीश जी की नेतृत्वकारी क्षमता एबीवीपी से जुड़ने के साथ दिखने लगी थी। उन्होंने परिषद के ध्येय – **'ज्ञान, शील और एकता'** को अपने जीवन का ध्येय मंत्र बना लिया। एबीवीपी के साथ जुड़कर अथवा सहकार भारती जैसी राष्ट्र निर्माण को समर्पित संस्था/पत्रिका के माध्यम से 'राष्ट्र प्रथम' की भावना वाली नई पीढ़ी के निर्माण की बात हो, आप राष्ट्रीय गौरव के लिए सदा समर्पण के साथ कार्य करते रहे हैं। आपके कुशल नेतृत्व व मार्गदर्शन के कारण ही एबीवीपी न केवल भारत का अपितु विश्व का सबसे बड़ा छात्र संगठन बन चुका है।

अपने प्रयासों से युवाओं की रचनात्मक ऊर्जा को सकारात्मक दिशा प्रदान करने वाले सतीश जी से मेरा जुड़ाव और लगाव विश्वविद्यालय के दिनों से ही है, मैं स्वयं को अत्यंत सौभाग्यशाली मानता हूँ। सहकार भारती पत्रिका के ऊर्जावान सदस्य और एबीवीपी के समर्पित कार्यकर्ता के रूप में वे राष्ट्र-गौरव के लिए सदैव मेरा पथ आलोकित करते रहे। एक कार्यकर्ता के रूप में एबीवीपी से लेकर बीजेपी तक की यात्रा के माध्यम से राष्ट्र पुनर्निर्माण और उन्नति में मैं जो भी योगदान दे पा रहा हूँ, उसके पीछे एक प्रेरणास्रोत के रूप में उनका मार्गदर्शन हमेशा स्मरणीय रहेगा।

मैं श्री सतीशजी मराठे के अमृत महोत्सव वर्ष के अवसर पर आयोजित अभिनंदन समारोह की सफलता की कामना और 'सहकार सुगंध' के विशेष अंक के सुरुचिपूर्ण प्रकाशन हेतु हार्दिक शुभकामनाएँ प्रेषित करता हूँ।

(धर्मेन्द्र प्रधान)

सबको शिक्षा, अच्छी शिक्षा

MOE - Room No. 301, 'C' Wing, 3rd Floor, Shastri Bhavan, New Delhi-110 001, Phone : 91-11-23782387, Fax : 91-11-23382365
E-mail : minister.sm@gov.in



मुरलीधर मोहोळ
सहकारिता राज्य मंत्री
भारत सरकार

सत्यमेव जयते

MURLIDHAR MOHOL
Minister of State For Cooperation
Government of India



I am delighted to learn about the Amrit Mahotsav celebrations for Shri. Satish*ji* Marathe, a distinguished leader in the cooperative movement. His 75th birthday is a momentous occasion, and I extend my warmest wishes to him on this milestone.

Shri. Marathe's dedication to the cooperative sector is truly remarkable and unparalleled. As a founder member of Sahakar Bharati, former National President, and current Director of the Reserve Bank of India, he has worked relentlessly to strengthen and promote cooperative spirit in India. His active involvement in the Akhil Bharatiya Vidyarthi Parishad and his tenure as the Chairman of United Western Bank further demonstrate his commitment to public service. I commend his ongoing work with the RBI, National Housing Bank, and various other organisations. Shri Marathe's enriching experience and insightful understanding of the cooperative sector have been invaluable in shaping policies and initiatives that benefit millions, especially in rural India.

I feel truly honoured to be associated with this celebration of Shri Marathe's life and achievements. I join his family, friends, and colleagues in wishing him a long, healthy, and fulfilling life ahead. May his wisdom and guidance continue to inspire generations to come.

I offer my best wishes to the organisers of this Amrit Mahotsav celebrations and for the grand success of the event. I am confident that the special issue of *'Sahakar Sugandha'* will serve as a befitting tribute to Shri Satish*ji* Marathe's extraordinary journey and his invaluable contributions to the cooperative movement in the service of Bharat Mata.

Jai Hind! Jai Sahakar!

**(Murlidhar Mohol)**

8वां तल, अटल अक्षय उर्जा भवन
लोधी रोड, नई दिल्ली-110003

8th Floor, Atal Akshay Urja Bhawan,
Lodhi Road, New Delhi - 110003

## मित्रवर्य सतीशजी, आपल्या अमृत महोत्सवानिमित्ताने आपले अभिनंदन आणि खूप खूप शुभेच्छा!

।।श्री।।

जीवेत् शरदः शतम् ।
या जन्मीची गत जन्मीची, पुण्याई सुफलो ।
दीर्घ निरामय आयुष्याची, संधी तुम्हा लाभो ।
विघ्नविनाशक गणेश तुम्हा, वर देवो सुखदम् ।। १।।
जीवेत् शरदः शतम् ।
पुत्रपौत्र धन धान्य संपदा, वर्षतु तुमच्या गेही ।
विजयश्रीची अवतीभवती, सदा फिरो ग्वाही ।
उणीव कसली तुम्हास न भासो, आस हीच नित्यम् ।।२।।
जीवेत् शरदः शतम् ।
उभय लोकीचे सौख्य साधण्या, स्मरा पंचसाधना ।
जिवाशिवाचे ऐक्य साधण्या, नको दुजी कल्पना ।
नरजन्माचे सार्थक व्हावे, ध्येय हेच सत्यम् ।।३।।
जीवेत् शरदः शतम् ।


OPEL PRO SCRO
PRICE I PERFORMANCE I BRILLANCE
Manufacturers of Waste Processing Equipments

श्री. सुरेंद्र धारप, श्री. मनोज धारप
कर्वेनगर, पुणे






आरबीआय संचालक सतीश मराठे यांना मानपत्र प्रदान करताना रा.स्व.संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी, छायाचित्रात डावीकडून महामंत्री विवेक जुगादे, राष्ट्रीय महामंत्री चौरसिया, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, मध्यभागी सतीश मराठे, उजवीकडे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी आणि प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके.

# रा.स्व.संघाकडून सहकारात काम करण्याची प्रेरणा

## सतीशजी मराठे यांचा अमृत महोत्सवी सोहळा उत्साहात साजरा

**मुंबई – अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमुळे काम करण्याची प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळाले तसेच सहकाराच्या व्यापक क्षेत्रात काम करण्याची संधी ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दिली तर सहकार भारतीने त्याला व्यापक स्वरूप दिले, असे मत आरबीआयचे संचालक आणि सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांनी सांगितले. येणाऱ्या काळात कार्यकर्त्यांनी स्वत:ला झोकून संघटनेचे काम केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.**

मराठे यांचा अमृत महोत्सवी सोहळा येथे नुकताच झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांच्या हस्ते मराठे दांपत्याचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी, माजी केंद्रीय मंत्री व देशाच्या नवीन सहकार धोरण समितीचे अध्यक्ष सुरेश प्रभू, इफकोचे अध्यक्ष डॉ. उदय शंकर अवस्थी, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय महामंत्री दीपक चौरसिया, सतीशजींच्या पत्नी भारती मराठे, सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके, प्रदेश महामंत्री विवेक जुगादे व्यासपीठावर उपस्थित होते. सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी संपादित केलेल्या सतीश मराठे गौरव विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.




दीपप्रज्वलन करताना रा.स्व.संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी, छायाचित्रात डावीकडून माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, मध्यभागी सतीशजी मराठे आणि उजवीकडे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी

**❊ आजवरच्या वाटचालीचा आढावा –**

यावेळी मराठे यांनी सहकार भारतीच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या वाटचालीचा मागोवा घेतला. यावेळी ते म्हणाले की, महाविद्यालयीन शिक्षण सुरू असताना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्याशी संबंध आला. तेथूनच एका अर्थाने सामाजिक कार्याचा प्रारंभ झाला. त्या माध्यमातून अनेकांचा परिचय झाला. परिषदेचे काम १० ते १२ वर्षे केल्यावर सहकार क्षेत्राशी संपर्क आला. सुरुवातीला या क्षेत्राबाबत फारशी कल्पना नव्हती. तत्कालीन जेष्ठ नेते तात्या इनामदार, मधुकरराव भागवत दत्तोपंत ठेंगडी यांच्याकडून कामाची प्रेरणा मिळाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबरोबर नाते जोडले गेले होते. त्यातूनच सहकार क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा अधिकच वृद्धिंगत होत गेली. देशातील सहकार क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यामध्ये तसेच राष्ट्रीय स्तरावर सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन होण्यामध्ये सहकार भारतीची महत्वपूर्ण भूमिका आहे. संघटना वाढविणे, तसेच अध्ययन करणे या कामावर अधिक लक्ष केंद्रीत केले होते, असे त्यांनी नमूद केले.

**❊ कार्यकर्त्यांनी कार्यविस्तारावर भर द्यावा –**

सहकार भारतीचे संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार तसेच स्व. माधवराव गोडबोले यांचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान आहे. सहकार भारतीची सुरुवात महाराष्ट्रात झाली पण हळूहळू संपूर्ण देशभर




**सतीशजी मराठे यांच्या गौरव विशेषांकाचे प्रकाशन सोहळ्याचे छायाचित्र**

त्याचा विस्तार झाला. मुख्य बाब म्हणजे सहकार भारतीच्या कामाला देशव्यापी स्वरूप प्राप्त करून देण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी यांचा मोठा वाटा आहे, असे त्यांनी सांगितले. सहकार भारतीची भूमिका, कार्यप्रणाली आणि तत्त्वे प्रत्येक कार्यकर्त्याने समजावून घेऊन कार्यक्षेत्र व्यापक करण्यावर भर दिला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**❊ कार्यासाठी समर्पणाची गरज –**

जोशी यांनी मनोगतात सांगितले की, १०० वर्षाच्या अथक प्रवासानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची उद्दिष्टाच्या दृष्टीने योग्य प्रकारे वाटचाल सुरू असून हे उद्दिष्ट नक्कीच पूर्णत्वास जाईल असा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले सामाजिक कार्यात काम करताना स्वत:ला त्यामध्ये सामावून घ्यावे लागते. वैचारिक प्रतिबद्धता असल्याखेरीज काम करता येत नाही. त्यासाठी संपूर्ण समर्पणची आवश्यकता असते. आणि हे समर्पण अंतरमनातून असावे लागते. कोणतेही करी हे केवळ विचारावर मोठे होत नाही विचार हे श्रेष्ठ आहेत पण कार्य हे संघटना चालविणाऱ्या व्यक्तीच्या माध्यमातून मोठे होत असते, असे ते म्हणाले.

**❊ मराठे यांच्या कार्याचा गौरव –**

उपस्थित वक्त्यांनी मनोगतातून मराठे यांच्या कार्याचा गौरव केला. सहकार भारतीचे कार्य शून्यातून कसे निर्माण झाले, याची प्रचिती अनेक वक्त्यांच्या उद्बोधनातून आली. संचालन सहकार भारती राष्ट्रीय महिला प्रमुख रेवती शेंदुर्णीकर यांनी केले.

सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर, महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रसाद लोढा, कॉसमॉस बँकेचे माजी अध्यक्ष मिलिंद काळे, सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतींद्रभाई मेहता, महाराष्ट्र को-ऑप. बँक्स फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, महाराष्ट्र को-ऑपरेटिव बँक असोसिएशनचे अध्यक्ष भाऊ कड, टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, सुभाष जोशी, प्रकाश पाठक, विलास देसाई यांच्यासह अनेक बँकांचे अध्यक्ष, संचालक व संपूर्ण देशभरातून सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# कॉसमॉस बँक, पुणे येथे रंगला अमृतमहोत्सवी सोहळा

**पुणे –** सहकार भारती संस्थापक सदस्य आणि आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्याच्या निमित्ताने कॉसमॉस बँकेतील सभागृहात विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, महाराष्ट्राचे माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. मुकुंद तापकीर आणि विद्यमान महामंत्री विवेक जुगादे आणि सहकार भारतीचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच विविध सहकारी बँका, पतसंस्था साखर कारखाने, गृहनिर्माण संस्था शासकीय अधिकारी तसेच अन्य सहकारी संस्थेतील पदाधिकारी, अधिकारी आणि कार्यकर्ते यांनी मराठे यांना शुभेच्छा दिल्या.

सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, कॉसमॉस बँकेचे माजी अध्यक्ष मिलिंद काळे आणि बुलढाणा सहकारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यांनी सोहळ्याचे नियोजन केले होते. यावेळी मराठे यांचे सुवासिनींनी औक्षण केले. त्यानंतर कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे आणि माजी अध्यक्ष मिलिंद काळे यांच्या हस्ते श्री. मराठे, डॉ. जोशी आणि डॉ. तापकीर यांचा पगडी प्रदान करून सन्मान करण्यात आला.

**आगामी काळात अर्थव्यवस्थेची गती वाढणार –**

मनोगत व्यक्त करताना मराठे यांनी सांगितले की, गेल्या १० वर्षांच्या कालावधीत देशाची अर्थव्यवस्था गतिमान झाली आहे. तसेच आगामी किमान दहा वर्षे ही गती आणखी वाढणार आहे. मात्र त्याचप्रमाणे सर्वसामान्य जनतेचे उत्पन्न वाढण्याची गरज आहे. यासाठी सहकारी बँकांनी प्रामुख्याने ग्रामीण भागावर अधिक लक्ष





देण्याची गरज आहे. कृषी प्रक्रिया, दूध व्यवसाय, पशुसंवर्धन याप्रमाणे सहकार क्षेत्रातील अन्य घटकांकडे जास्त लक्ष दिले पाहिजे. त्यामुळे सध्याचा जीडीपीचा जो दर आहे. त्यामध्ये वाढ होऊन तो किमान साडे आठ ते नऊ टक्के होऊ शकेल. तसेच ग्रामीण भागासाठी नवनवीन सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा बँकांनी पुढाकार घ्यायला हवा. कारण आगामी काही वर्षांत सहकार क्षेत्राचे महत्त्व मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

**सहकारातील विविध व्यक्तीमत्त्वांची उपस्थिती –**

कार्यक्रमाला सहकार चळवळीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. निवडणूक प्राधिकरण मुख्य आयुक्त अनिल कवडे माजी सहकार आयुक्त दिनेश ओउळकर कॉसमॉस बँक माजी अध्यक्ष मिलिंद काळे अधिकारी संजय खडके बँकिंग तज्ञ गणेश निमकर, अभय माटे, महाराष्ट्र गृहनिर्माण सहकारी संघाचे सुहास पटवर्धन, लेखक श्रीकांत जाधव, सुधीर पंडित अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे गोविंदराव कुलकर्णी लेखिका वंदना धर्माधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सहकार अध्यासनचे प्रमुख अनिल कारंजकर उद्यम सहकारी बँकेच्या उपाध्यक्ष अनास्कर तसेच योगिराज सहकारी पतसंस्था, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, विश्वेश्वर सहकारी बँक सरस्वती महिला सहकारी पतसंस्था, महाराष्ट्र हाऊसिंग फेडरेशन, जनता सहकारी बँक, जनसेवा सहकारी बँक, राजगुरूनगर सहकारी बँक, पिंपरी चिंचवड सहकारी बँक, पुणे ऑडिटर्स असोसिएशन, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना आदी संस्थांच्या पदाधिकारी, अधिकारी यांनी मराठे यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी केले.



# महाराष्ट्र आणि राजस्थानचे महामहीम राज्यपाल यांच्या हस्ते झालेला सत्कार सोहळा







## कौटुंबिक सोहळा

डोंबिवलीच्या सुयोग मंगल कार्यालयात कौटुंबिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सभागृहातील सुबक तसेच आकर्षक सजावटीमुळे कार्यक्रम अधिक दिमाखदार झाला. अनामय मराठे याचे सूत्र संचालन, स्वप्नील शेटे, पुष्कर व मिलिंद मराठे यांनी कौटुंबिक व सामाजिक संबंधात घेतलेली खुमासदार मुलाखत आणि सर्वावर कडी म्हणजे नातु विहान शेटे याच्या रॅपिड फायर राउंडने कार्यक्रमात धमाल उडवून दिली. अमृत महोत्सवी वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा...





# सहकार भारतीचा आधारवड

**सहकार भारती महाराष्ट्राचे महामंत्री, राष्ट्रीय महामंत्री, राष्ट्रीय अध्यक्ष, संरक्षक अशा सर्वच पदांवर त्यांनी आपल्या कामाचा ठसा निर्माण केला. याच काळात शासनाच्या उच्चस्तरीय समितीवरही श्री. सतीशजींनी काम केले. या सर्वांचा कळसाध्याय म्हणजे, रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळावर सहकार क्षेत्राचा कोणीतरी प्रतिनिधी असावा असा विचार मोदी सरकारने केल्यानंतर श्री. सतीश मराठे यांचे एकमात्र नाव समोर आले आणि तशी सुवर्ण संधी त्यांना दोन टर्म मिळाली.**



**डॉ. उदय जोशी**
राष्ट्रीय अध्यक्ष

जनकल्याण बँकेच्या पनवेल ब्रांचच्या उद्‌घाटन कार्यक्रमात, मराठी रंगभूमीवरील सुप्रसिद्ध मालवणी रंगकर्मी कै. मच्छिंद्र कांबळी यांनी श्री. सतीश मराठे यांचे वर्णन केले होते की, ''श्री. सतीश मराठे म्हणजे काय तर ते माणसांना ओढून घेणारा एक पॉवरफुल चुंबक असा.'' गेल्या अनेक वर्षांमध्ये मी याचा वेळोवेळी अनुभव घेतलेला आहे. मी स्वतःसुद्धा हा अनुभव घेतला. अलिबागमधील कमळ नागरी पतसंस्थेमध्ये काम करीत असताना, मलाही माझ्या नकळत सहकार भारतीमध्ये त्यांनी खेचले ते कायमचेच. पुढे त्यातूनच सहकार भारतीच्या कामामध्ये अनेक दायित्त्व पूर्ण करीत, आज सहकार भारतीच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदावर काम करण्याची सुवर्ण संधी मला मिळाली आहे.

संपूर्ण देशभर सहकार भारतीचा कोठेही नामोल्लेख होताच, श्री. सतीश मराठे यांचा आवर्जून संदर्भ आजही जोडला जातो. सहकार भारतीच्या स्थापनेपासून, बाल्यावस्थेत असल्यापासून संगठनेच्या कामकाजात गेली ४७ वर्षे एकाच संस्थेत सातत्याने कार्यरत राहणे, ही श्री. सतीशजी यांची खासियत म्हटली पाहिजे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे केंद्रीय कोषाध्यक्ष असताना, बँक ऑफ इंडियापासून अर्थार्जनास प्रारंभ केला. परंतु, सहकार भारतीचे काम करण्यासाठी, आपला स्वतःचा सहकाराशी संबंध असला पाहिजे म्हणून प्रारंभी डोंबिवली नागरी सहकारी बँक आणि त्यानंतर जनकल्याण सहकारी बँकेमध्ये प्रदीर्घ काळ त्यांनी सेवा केली. जनकल्याण बँकेची सहकार क्षेत्रात घोडदौड होण्यास श्री. सतीशजी यांचे नेतृत्त्व मुख्यतः कारणीभूत होते. इंडियन बँक्स असोसिएशनचे मानद सेक्रेटरी, महाराष्ट्र आणि गोवा ॲपेक्स बँकेचे संचालक पदावर काम करण्याची सुसंधी त्यांना मिळाली. इफको या संस्थेमार्फत, ''सहकार रत्न'' हा सन्मान देखील त्यांना प्राप्त झाला.

पुढे काळाची गरज म्हणून खासगी क्षेत्रातील युनाइटेड वेस्टर्न बँकेचेही नेतृत्त्व करण्याची संधी श्री. सतीशजी यांना प्राप्त झाली. या काळात स्वाभाविकच सहकार भारतीच्या कामासाठी पुरेसा वेळ त्यांना मिळत नसे. पुढे नोकरी सोडून परत एकदा सहकार भारतीच्या कार्यामध्ये श्री. सतीशजींनी स्वतःला झोकून दिले. सहकार भारती महाराष्ट्राचे महामंत्री, राष्ट्रीय महामंत्री, राष्ट्रीय अध्यक्ष, संरक्षक अशा सर्वच पदांवर त्यांनी आपल्या कामाचा ठसा निर्माण केला. याच काळात शासनाच्या उच्चस्तरीय समितीवर श्री. सतीशजींनी काम केले. या सर्वांचा कळसाध्याय म्हणजे, रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळावर सहकार क्षेत्राचा कोणीतरी प्रतिनिधी



असावा असा विचार मोदी सरकारने केल्यानंतर श्री. सतीश मराठे यांचे एकमात्र नांव समोर आले आणि तशी सुवर्ण संधी त्यांना दोन टर्म मिळाली. अतिशय सौम्य प्रवृत्ती, मृदुभाषी, स्वतः फारशी प्रतिक्रिया व्यक्त न करता, सर्व कार्यकर्त्यांची बाजू शांतपणे ऐकणारा कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. प्रत्येक विषयात संघर्ष करण्यापेक्षा संवाद साधण्यावर श्री. सतीशजी यांचा भर असतो. सहकाराच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या शिखर संस्था या आपल्या स्पर्धक नव्हे तर परस्पर पूरक भूमिकेमध्ये सहकार भारतीने कार्य करावे असा त्यांचा आग्रह असतो. संधी मिळेल तेव्हा सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांनी, विविध शिखर संस्थामध्ये नेतृत्त्व करण्याची संधी कधीही सोडू नये अशी व्यवहार्य बाजू ते नेहमी मांडतात. सहकार भारतीने भौगोलिक विस्तारासोबतच, प्रकोष्ठ विस्तार करण्यावर सहकार भारतीचा भर असावा असा त्यांचा कटाक्ष असे. असा सर्वांगीण विचार करण्याची प्रवृत्ती प्रा. यशवंतराव केळकर यांच्यामुळे विकसित झाली, अशी प्रांजळ कबुली श्री. सतीशजी देत असतात.

हे सर्व करीत असताना आमच्या सारख्या अनेक नवनवीन कार्यकर्त्यांना सहकार भारतीचे नेतृत्व करण्याचा मार्ग श्री. सतीशजी यांनी प्रशस्त करून



दिला. त्यामुळेच वयाची ७५ वर्षे पूर्ण करणे ही केवळ संख्या आहे. या वयातही त्यांची प्रवास करण्याची क्षमता तरुणांनाही लाजवणारी आहे. हे सर्व करताना त्यांच्या सर्व कुटुंबीयांची संमती त्यांनी गृहीत धरली असावी. अशा आमच्या दृष्टीने तारुण्यामध्ये असणाऱ्या, अशा या वरिष्ठ कार्यकर्त्याला मानाचा सलाम तसेच उर्वरित आयुष्य आयुरारोग्य संपन्न जावो हीच शुभेच्छा. त्यांच्या अनुभव संपन्नतेचा लाभ यापुढेही आम्हा सर्वांना लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

**डॉ. उदय जोशी,**
राष्ट्रीय अध्यक्ष, सहकार भारती.





# श्री सतीश मराठे : त्याग और तप के बूते सहकार भारती का किया विस्तार

**श्री मराठे जी की मेहनत और समर्पण का ही नतीजा है कि आज हमारा संगठन सहकार भारती एक वट वृक्ष का रूप ले चुका है। उम्र के इस पड़ाव पर भी श्री मराठे जी पीड़ित मानवता की सेवा के लिए प्रतिबद्ध हैं। ऐसे व्यक्ति का जीवन अनुकरणीय होता है।**



**दीपक चौरसिया**
राष्ट्रीय महामंत्री

समाज के लिए समर्पित किसी व्यक्ति का सम्मान इसलिए किया जाता है ताकि उसके व्यक्तित्व और कृतित्व के बारे में देश और समाज के लोग जानें, उनसे प्रेरित हो सकें और उनके बताए आदर्शों पर चल सकें। आज हम एक ऐसी ही शख्सियत का जिक्र कर रहे हैं जिन्होंने पीड़ित मानवता की सेवा के लिए अपना पूरा जीवन न्योछावर कर दिया। वो शख्स हैं हम सबके मार्गदर्शक और सहकार भारती के संस्थापक सदस्यों में एक श्री सतीश मराठे जी। उनके त्याग और तप के दम पर आज सहकार भारती का देश भर में विस्तार हो चुका है।

श्री मराठे जी अपने जीवन के ७५वें वर्ष में प्रवेश कर चुके हैं। यह हम सबके लिए अत्यंत खुशी और गर्व के पल हैं। मनुष्य जन्म से नहीं, कर्म से महान बनता है...यह कहावत श्री मराठे जी पर अक्षरशः लागू होती है।

श्री सतीश मराठे जी का जन्म दिनांक १ फरवरी, १९५० को हुआ था। बेहद साधारण परिवार में जन्में श्री मराठे जी ने त्याग और संघर्ष के बूते अपनी पहचान बनाई। यह जानकार आप सबको आश्चर्य होगा कि कॉलेज के दिनों में जीविकोपार्जन के लिए वे दिन में काम करते थे और सुबह की पाली में शिक्षा ग्रहण करते थे। प्रतिकूल परिस्थितियों में श्री मराठे जी ने बॉम्बे विश्वविद्यालय से वाणिज्य और कानून में स्नातक की डिग्री हासिल की। इसके अलावा भारतीय विद्या भवन से पत्रकारिता में डिप्लोमा किया और गोल्ड मेडल के साथ टॉप किया।

श्री मराठे जी ने अपने बैंकिंग करियर की शुरुआत बैंक ऑफ इंडिया से की और २००२ से २००६ तक यूनाइटेड वेस्टर्न बैंक लिमिटेड के अध्यक्ष और सीईओ बने। इससे पहले वे सितंबर १९९१ में जनकल्याण सहकारी बैंक लिमिटेड के सीईओ बने, जिसने अपने १० साल के कार्यकाल के दौरान लगातार उच्च वृद्धि दर्ज की।

श्री मराठे जी सहकार भारती के संस्थापक सदस्य हैं जिसे वर्ष १९७९ में पंजीकृत किया गया था। वे ३ वर्ष तक संगठन के संरक्षक और ६ वर्ष तक अध्यक्ष भी रहे। सहकार भारती ने पूरे भारत में अपनी गतिविधियों का विस्तार किया है और वर्तमान में, ३५,००० से अधिक सहकारिताएं सहकार भारती से जुड़ी हुई हैं। यह देश में सहकारी क्षेत्र का सबसे बड़ा एनजीओ है।

उम्र के इस पड़ाव पर भी श्री मराठे जी पिछले कई वर्षों से वित्त मंत्रियों के साथ बजट पूर्व बैठकों में सहकारी क्षेत्र का प्रतिनिधित्व

कर रहे हैं। वर्तमान में वे भारतीय रिजर्व बैंक के केंद्रीय बोर्ड के निदेशक हैं। इसके अलावा उन पर राष्ट्रीय आवास बैंक के निदेशक की भी ज़िम्मेदारी है। इंडियन इंस्टीट्यूट ऑफ इनसॉल्वेंसी प्रोफेशनल्स ऑफ आईसीएआई के स्वतंत्र निदेशक के साथ-साथ राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद (एनसीसीटी) की कार्यकारी समिति के सदस्य हैं। इसके अलावा लक्ष्मणराव इनामदार राष्ट्रीय सहकारिता अनुसंधान एवं विकास अकादमी (लिनाम) के उपाध्यक्ष पद पर आसीन हैं। त्रि-स्तरीय अल्पकालिक सहकारी ऋण संरचना (एसटीसीएस) की प्रासंगिकता पर अध्ययन करने के लिए भारत सरकार द्वारा नियुक्त विशेषज्ञ समिति के सदस्य भी हैं। भारत सरकार द्वारा नियुक्त सहकारिता नीति का मसौदा तैयार करने के लिए गठित राष्ट्रीय समिति के सदस्य हैं। श्री मराठे जी पर पालघर जिले में मूक-बधिर आदिवासी बच्चों के लिए आवासीय विद्यालय संचालित करने वाले प्रगति प्रतिष्ठान के न्यासी का भी दायित्व है।

पूर्व में श्री मराठे जी राष्ट्रीय सहकारी विकास निगम (एनसीडीसी) के प्रबंधन बोर्ड के सदस्य रहे। इसके अलावा वर्ष २००१ में भारतीय बैंक संघ के सचिव, दो बार इसकी प्रबंध समिति के सदस्य और अर्थशास्त्रियों की समिति के सदस्य भी रहे। इसी वर्ष कमजोर और बीमारु शहरी सहकारी बैंकों के संबंध में महाराष्ट्र सरकार द्वारा गठित उच्च शक्तिप्राप्त समिति के सदस्य की ज़िम्मेदारी निभाई। वर्ष २००५-०६ में निजी क्षेत्र के बैंकों के संघ के उपाध्यक्ष रहे। महाराष्ट्र सरकार द्वारा गठित राज्य सहकारी परिषद के सदस्य के रूप में चार वर्षों (१९९५ से १९९९) तक अपनी भूमिका का निर्वहन किया। इसके अलावा श्री मराठे जी ने एपेक्स बैंक ऑफ अर्बन बैंक ऑफ महाराष्ट्र एंड गोवा लिमिटेड के निदेशक पद को सुशोभित किया। नेशनल यूथ को ऑपरेटिव सोसाइटी लिमिटेड और बहुराज्य बहुउद्देश्यीय सहकारी समिति के भी निदेशक रहे। राजकोट नागरिक सहकारी बैंक लिमिटेड निदेशक मंडल व बहु राज्य अनुसूचित सहकारी बैंक के निदेशक के अलावा ठाणे भारत सहकारी बैंक लिमिटेड निदेशक मंडल व अनुसूचित बैंक के विशेषज्ञ निदेशक रहे।

यह जानकार आप सबको बहुत खुशी होगी कि श्री मराठे जी के अमूल्य योगदान को देखते हुए २०१५ में इफको ने उन्हें सहकारिता रत्न पुरस्कार से सम्मानित किया। वह महाराष्ट्र से इस पुरस्कार के एकमात्र प्राप्तकर्ता हैं। श्री मराठे जी सहकारी क्षेत्र में अध्ययन और अनुसंधान करने के लिए भारतीय कंपनी अधिनियम, २०१३ की धारा ८ के तहत पंजीकृत एक फाउंडेशन, सेंटर फॉर स्टडीज एंड रिसर्च इन को-ऑपरेशन के संस्थापक निदेशक हैं।

श्री मराठे जी की मेहनत और समर्पण का ही नतीजा है कि आज हमारा संगठन सहकार भारती एक वट वृक्ष का रूप ले चुका है। उम्र के इस पड़ाव पर भी श्री मराठे जी पीड़ित मानवता की सेवा के लिए प्रतिबद्ध हैं। ऐसे व्यक्ति का जीवन अनुकरणीय होता है। सम्मान के जरिये हम उनके योगदान को याद करते हैं।



# सहकार चळवळीतील अभ्यासू व्यक्तीमत्त्व

**सतीशजी यांचे जीवन गायबच कार्य बघणे राहिले आहे नवं काहीतरी करण्याची उमेद आणि उत्साह हा त्यांच्यात होतं सर्व कार्यकर्त्यांना मित्रत्वाच्या नात्याने जोडणारा आणि हे मित्रत्वाचे नाते कधीही खंडित होणार नाही असा माणूसकीचा व्यवहार हे सतेजींच्या व्यक्तित्वाचे प्रमुख लक्षण आहे**



**डॉ. मुकुंद तापकीर**

माझे ज्येष्ठ बंधुतुल्य आदरणीय सतीश मराठे यांच्या अमृत महोत्सवा निमित्ताने आम्ही सर्व कार्यकर्ते त्यांचा सत्कार आणि सन्मान करीत आहोत. मा. सतीशजी आणि माझा गेली पन्नास वर्षांपासून खूप जवळून परिचय आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कामात पन्नास वर्षांपूर्वी त्यांचा परिचय झाला, त्यावेळेला ते मुंबईमध्ये आणि मी पुण्यामध्ये विद्यार्थी परिषदेचे काम करीत होतो. अर्थात सतीशजी माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेतच. विद्यार्थी परिषदेच्या कामाच्या संस्कारामुळे आणि त्यांच्या उपजत बुद्धी कौशल्यामुळे सतीशजी हे नेहमीच एक शिस्तबद्ध, नियोजनबद्ध असे कार्यकर्ते आम्ही पाहत आलो आहोत. त्यांचे इंग्रजीवर उत्तम प्रभुत्व हे आपल्याला वेळोवेळी जाणवते. अनेक प्रारूपे, काही ड्राफ्ट्स तसेच विद्यार्थी परिषद असो वा सहकार भारती असो त्यातील अनेक अधिवेशनातील प्रस्तावांचे मसुदे सतीशजींनी सर्व समावेशक पद्धतीने तयार केले आहेत. बैठकीच्या निमित्ताने तसेच अधिवेशनाच्या निमित्ताने विद्यार्थी परिषदेत काम करत असताना अनेक वेळा त्यांच्याशी महत्त्वाची चर्चा तसेच मार्गदर्शन घेण्यासाठी कितीतरी वेळा भेटी झाल्या आहेत आणि आजही त्याच भावनेने आम्ही भेटत असतो.

विद्यार्थी परिषदेच्या कामात असताना त्यांनी बी.कॉम व पत्रकारिता पदवी प्राप्त केली आणि लगेचच बँक ऑफ इंडियामध्ये नोकरीला सुरुवात केली आणि त्याचवेळेला विद्यार्थी परिषदेच्या वेगवेगळ्या प्रकल्पांच्या बांधणीमध्ये व ते यशस्वी करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्याकाळी त्यांच्या आणि आमच्यापैकी काहींच्या पूर्व पुण्याईमुळे स्वर्गीय यशवंतराव केळकर, ॲड. बाळासाहेब आपटे, स्व. मदनदासजी यांचा सहवास आणि मार्गदर्शन लाभले आणि तोच वारसा त्यांच्यामुळे आम्हाला मिळाल्यामुळे आपण समाजाच्या कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात काम करून समाज बांधणीचे काम करण्याची संधी मिळत गेली. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कामानंतर आमच्यापैकी अनेक कार्यकर्ते हे वेगवेगळ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये कार्य करू लागले. संघटनात्मक कामाचा संस्कार आणि त्यातून आदर्श कार्यकर्ता, सुजाण नागरिक घडविण्याच्या कामात गेली ५० वर्षांपासून विविध क्षेत्रांमध्ये राष्ट्रीय कर्तव्य आणि सामाजिक जाणिवेच्या भावनेने प्रदीर्घ काळ काम करीत आहोत.

सतीशजींच्या आयुष्यातील पुढच्या वाटचालीतील टप्पा म्हणजे सहकार भारती या सहकार क्षेत्रात काम करणारी एक राष्ट्रव्यापी संघटना. संघटना





उभारणीचे महत्त्वाचे कार्य सहकार भारतीच्या स्थापनेपासून गेले ४५-४६ वर्ष सतीशजी अविरतपणे करीत आहेत. सहकार भारतीच्या स्थापनेच्या वेळेला सहकार भारतीचे संघटन आजच्यासारखे मजबूत नव्हते. स्व. लक्ष्मणराव इनामदार यांनी १९७९ मध्ये सहकार भारतीच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका पार पाडली आणि त्यांच्याबरोबरच सतीशजी मराठे यांच्याकडे तेव्हापासून सहकार भारतीचे संघटन उभारण्याचे काम हाती आले. तेव्हापासून आजपर्यंत सतीशजींनी अहोरात्र मेहनत घेतली. देशभर वेगवेगळ्या प्रदेशात त्यातील काही गावात महानगरात जिल्हास्तरापर्यंत सहकार भारतीच्या कार्याचा विस्तार करण्यासाठी प्रदीर्घ प्रवास केला आणि आजही करीत आहेत. हे करत असताना त्यांनी आपले बँकिंग क्षेत्रातील करिअर सुद्धा विकसित केले. बँक ऑफ इंडियाची नोकरी काही काळानंतर सोडली. परंतु त्याच काळात संघ परिवारातील त्या त्या गावचे कार्यकर्ते एकत्र येऊन नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था अशा सहकार क्षेत्रातील संस्था स्थापन करीत होते. त्यामुळे एक ज्येष्ठ अनुभवी म्हणून सतीशजींनी काही काळ डोंबिवली नागरी सहकारी बँक त्यानंतर चेंबूर मधील जनकल्याण नागरी सहकारी बँक यात कार्यकारी संचालक म्हणून यशस्वीपणे कार्य केले. त्यानंतर महाराष्ट्रातील खूप जुनी आणि प्रभावी बँक म्हणून युनायटेड वेस्टर्न बँक कार्यरत होती. या बँकेचे कार्यकारी संचालक आणि अध्यक्ष या नात्याने काम करण्याची संधी मिळाली. आपल्या सुमधूर संवाद कौशल्यामुळे बँकिंग क्षेत्रातील विविध समस्यांचा अभ्यास त्यांना असल्यामुळे ते ज्या ज्या बँकेत केले त्या त्या बँकांचा आर्थिक विकास त्यांनी आपल्या कौशल्यामुळे यशस्वीरित्या पूर्ण केला. वयोमानाप्रमाणे या बँकांमधून जरी सेवानिवृत्ती घेतली, तरी गेले पंधरा-वीस वर्षांत सतीशजी वेगवेगळ्या बँकांचे सल्लागार म्हणून मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्या या अनुभव समृद्धीमुळे सध्या कितीतरी राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये सतीशजी संचालक म्हणून कार्य करीत आहेत. उदा. राष्ट्रीय सहकार धोरण ठरवणारी एन.सी.यु.आय. (राष्ट्रीय सहकारी संस्थांचा महासंघ दिल्ली), एन.सी.सी.टी. (नॅशनल कौन्सिल फॉर ऑपरेटिव्ह ट्रेन) सारख्या संस्थांमध्ये संचालक या नात्याने सतीशजी कार्यरत आहेत आणि आपले योगदान सहकार चळवळीमध्ये देत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव, कार्याची नोंद घेऊन त्यांचा इफको या राष्ट्रीय सहकारी संस्थेने त्यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. सहकार भारतीची कार्यपद्धती विकसित करण्यात, सैद्धांतिक भूमिका ठरविण्यात, हजारो कार्यकर्त्यांना मैत्रीच्या नात्याने जोडून त्यांच्यामार्फत आणि त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे आज सहकार भारती ही आपल्या देशातील सर्वात मोठी, विशाल अशा स्वरूपाची संघटना उभी करून सहकार चळवळीचे कार्य सहकार चळवळ नैतिकतेच्या पायावर उभे करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आजही सतीशजींचा या कामासाठी महिन्यातील दहा ते पंधरा दिवस प्रवास असतो. त्यांच्या अंगीभूत गुणांमुळे कार्यकर्त्यांना सहकार भारतीच्या पलीकडे काम करणाऱ्या सहकारी संस्थांना त्यांचे मौलिक मार्गदर्शन लागते. त्यामुळे त्यांच्याविषयी एक आकर्षण सर्वांना असते आणि ते सर्वांना हवेहवेसे वाटत असतात. त्यांचे अकृत्रिम प्रेम हे सर्वांना मिळत असते. त्यामुळे असंख्य मित्र त्यांनी जोडले आहेत आणि जपले आहेत. अनेक बँकांचे रिझर्व्ह बँकेकडे विलंबित असलेले अनेक प्रश्न समस्या सोडवण्यासाठी सतीशजी प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. अनेक शाखांची उद्‌घाटन हे राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावरील सहकार परिषदांना प्रमुख वक्ते या नात्याने सहकार चळवळीचे दिशादर्शन करीत असतात. गेली अनेक वर्षे केंद्रीय अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन अर्थमंत्री यांच्याशी संवाद करून अर्थसंकल्पात सहकार चळवळीला कसे स्थान प्राप्त होईल या दृष्टीने प्रयत्नशील असतात. त्यामुळे गेल्या दहा वर्षांतील सहकारी धोरणांमध्ये केंद्र सरकार मा. सतीशजींचे आणि काही प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांचे मत विचारात घेऊन सहकार चळवळीचे धोरण ठरवले जाते. दोन-तीन वर्षांपूर्वी केंद्रीय सहकार मंत्री मा. अमितभाई शाह यांनी देशातील आणि जागतिक पातळीवरील आर्थिक बदलांचा विचार लक्षात घेऊन सहकार चळवळ समृद्ध करण्यासाठी सहकारी संस्थांचे कामकाज अधिक परिणामकारक पारदर्शक होण्यासाठी राष्ट्रीय सहकारी चळवळीचे धोरण ठरविण्यासाठी





समिती नेमली होती. त्यासाठी देशभरातील विविध संस्थांचे फेडरेशनचे पदाधिकारी यांची समिती तयार करून नवीन सहकार धोरण निश्चित करण्याचा विचार केला आहे. यासाठी माजी केंद्रीय मंत्री आणि सहकार चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते मा. सुरेशजी प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती राष्ट्रीय पातळीवरचे सहकार धोरण ठरवणार आहे. या समितीमध्ये मा. सतीशची मराठे व सहकार भारतीचे काही प्रमुख पदाधिकारी यांनी हे धोरण ठरवण्यात महत्त्वाचा वाटा उचलला आहे. सतीशजींचे जीवन कायमच कार्यमग्न राहिले आहे. नवं काहीतरी करण्याची उमेद आणि उत्साह हा त्यांच्यात आहेच. सर्व कार्यकर्त्यांना मित्रत्वाच्या नात्याने जोडणारा आणि हे मित्रत्वाचे नाते कधीही खंडित होणार नाही असा माणुसकीचा व्यवहार हे सतीशजींच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रमुख लक्षण आहे आणि म्हणून त्यांच्या या अमृत महोत्सव निमित्ताने आम्ही सर्व कार्यकर्त्यांनी त्यांचा गौरव करण्याचे ठरवले आहे.

२०१२ साली आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्ताने सहकार भारतीच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिषद भोपाळ येथे आयोजित केली होती. ही परिषद यशस्वी करण्यासाठी सतीशजींनी खूप कष्ट घेतले. त्यामुळे देशभरातील आणि श्रीलंका, नेपाळ, इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया, नेपाळ या देशातील सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सहकार भारती ही देशातील पहिले संघटन की ज्यांनी अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय परिषद भरवण्याचे धाडस दाखविले याचे श्रेय मा. सतीशजींना जाते.

मा. सतीशजी वेळोवेळी महाराष्ट्रातील आणि देशभरातील सहकार भारतीचे कार्यकर्ते तसेच विविध सहकारी संस्था फेडरेशन्स यांचे पदाधिकारी, सदस्यांशी वेगवेगळ्या विषयावर चर्चा करतात. सल्लामसलत करतात. त्यामुळे आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे समाधान करावे, योग्य सल्ला द्यावा, ही सतीशजींची कायमच भूमिका राहिली आहे. एक सकारात्मक दृष्टीकोन, भूमिका असल्यामुळे व त्यांच्यातील आपुलकीमुळे हजारो कार्यकर्त्यांचे नेटवर्क त्यांनी जोडले आहे.

मुंबईत दिनांक १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या त्यांच्या अमृत महोत्सवी समारंभात देशभरातील सहकार भारतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध बँकांचे पदाधिकारी, फेडरेशनचे पदाधिकारी, हे सर्व एकत्र येऊन त्यांचा गौरव करणार आहेत. सतीशजींच्या या जीवनाच्या वाटचालीत त्यांना साथ देणाऱ्या आमच्या सौ. भारती वहिनी यांचा उल्लेख केल्याशिवाय हा लेख पूर्ण करणे शक्य नाही. कित्येक वर्षे त्यांच्याकडे अनेक मंडळी, कुणी दिल्लीवरून, कुणी कलकत्त्यावरून, कोणी बंगलोरवरून, चेन्नईवरून त्याठिकाणी कार्यकर्ते भेटायला येत असतात. त्या सर्वांचे स्वागत आणि त्यांची व्यवस्था नीट होईल याची काळजी व भारती वहिनी कायमच घेतात. त्याच आपुलकीच्या नात्याने कार्यकर्त्यांशी वागत असतात. या अमृत महोत्सवानिमित्ताने सतीशजींना उत्तम आरोग्य लाभो, दीर्घायुष्य मिळो, अशी प्रार्थना करीत आहोत धन्यवाद.





# माझा मित्र सतीश मराठे आणि ७५ ?

**एक जवळचा मित्र म्हणून अनेक आठवणी सांगता येतील. समोरच्यावर प्रभाव कसा पाडावा हे त्यांच्या कडून शिकावे. त्यांनी समोरचा व्यक्ती लहान किंवा मोठा हे कधी पाहिले नाही म्हणून माणसे त्यांच्या प्रेमात पडली. अशी माणसं समाजाला हवी आहेत.**



विष्णू बोबडे

पूर्वी शारदा या नाटकातले एक गाणं प्रसिध्द होते, अवयव पाडणारा, वयमान, दंताजीच ठाणे उठले फुटले दोन्ही कान'' ७५ वर्षे म्हणजे सगळे संपले पण आता तसे सर्वांच्या बाबतीत तसे नाही त्यात मराठे यांचा समावेश होता. असं म्हटल जाते की, संघ विद्यार्थी परिषद, या संस्था, संघटना माणंसं घडविणाऱ्या संस्था आहेत. याच संस्थेत आम्ही १९६८ ते १९६९ साली एकत्र आलो. तेव्हापासून आम्ही आजपर्यंत एकत्र आहोत. केव्हा वेगळे होऊ माहित नाही. परंतु व्यक्तींच्या जीवनात व्यक्ती येतात काही वर्षानुवर्षे एकत्र राहतात, काही वेगळया परंतु चांगल्या मार्गाने जातात, त्यात रविंद्र पवार आणि सतीष मराठे येतात. मी १९६८ साली गावावरून मुंबईत आलो, तसे माध्यमिक (१९ वी पर्यंत) शिक्षण साताऱ्यात झाले आहे. परंतु वाढलो गावातच, त्यामुळे कॉलेजला प्रवेश घेतला तेव्हा धड शुध्द मराठी ही बोलता येत नव्हते. त्यावेळी ही माणसे भेटली त्यात रविंद्र पवार व सतीष मराठे हे होते.

हे मी माझ्याबद्दल का लिहिले, तर मी एक ग्रामीण भागातून आलेला व १९५० साली इंजिनिअर असणाऱ्या व त्याकाळी चार चाकी गाडी म्हणजे कार ठेवणाऱ्या वडिलांचे पुत्र असलेल्या संतोष मराठेना भेटलो. मला घरी जेवायला घेवून गेला तेव्हा त्याची आई थोडी नाराज झाली व काहीतरी बोलून गेली. परंतु ती माझीसुध्दा आई झाली व मी त्यांच्या कुटूंबाचा सदस्य झालो व जवळजवळ १०-१२ माझे नित्यनियमाने जाणे येणे राहिले. आणीबाणीच्या २० महिन्याच्या काळात त्याच्या घरी मी त्याची जागा घेतली म्हटले तर वावगे ठरू नये. सदाशिव कुलकर्णी (आता त्याचे मेव्हणे) व मी नेहमीच त्याचे घरी जात येत असू.

एक जवळचा मित्र म्हणून अनेक आठवणी सांगता येतील. आणीबाणीमुळे माझी नोकरी गेली त्यानंतर मला जी नोकरी मिळाली त्याच बँकेत व तो ज्या मुख्य शाखेत मला पोस्टींग मिळाले ते सुध्दा त्याच्या डिपार्टमेंटला हा एक योगायोग. त्यांच्या कामगिरीबाबत अनेक गोष्टी सांगता येतील. मी अधिक सांगण्याची गरज आहे असं नाही त्या सर्वपरिचित आहेत. त्याची डेल कारनेजेचे पुस्तक वाचले किंवा नाही मला माहित नाही. परंतु समोरच्यावर प्रभाव कसा पाडावा हे त्यांच्या कडून शिकावे. त्यांनी समोरचा व्यक्ती लहान किंवा मोठा हे कधी पाहिले नाही म्हणून माणसे त्यांच्या प्रेमात पडली. अशी माणसं समाजाला हवी आहेत. मी त्यांना दीर्घायुष्य मिळो अशी परमेश्वराकडे प्रार्थना करतो.



# स्वांत सुखाय

जीवनात कसोशीने पाळावयाची वर्तनसूत्रे, विचार आणि व्यवहार, व्यावसायिक, कौटुंबिक आणि व्यक्तिगत विश्वातील वावर आणि सामाजिक कामाला अग्रक्रम देण्याचा आग्रह इत्यादी सर्व गोष्टीसंदर्भात आपल्या भोवती निर्माण केलेल्या छोट्या विश्वावर नेमक्या कोणत्या संस्कारांचा ठसा राहिला? मराठे यांच्या संदर्भात या प्रश्नाचा मागोवा घेतला तर, अतिशय स्पष्टपणे उत्तर मिळते, विद्यार्थी परिषद आणि मुख्यतः प्रा. यशवंतराव केळकर!



अरुण करमरकर

षष्ट्यब्दीपूर्ती, अमृत महोत्सव (७५ वर्षे) हे प्रसंग स्वाभाविकपणे सिंहावलोकनाला प्रवृत्त करतात. विशेषतः ज्याने/जिने विचारपूर्वक आपल्या जीवनाची मांडामांड केली आहे, अशा व्यक्तीला तर मागे वळून आपल्या जीवन प्रवासाकडे स्वस्थतेने पाहण्याचे निमित्त असे प्रसंग पुरवितात. गतानुगतिक पद्धतीने 'आला दिवस ढकलला' अशा चाकोरीबद्ध रीतीने ज्याने जीवन व्यतीत केले आहे, अशा व्यक्तीला सुद्धा या टप्प्यावर अंतर्मुख व्हावेसे वाटते. ज्या व्यक्तीने जाणतेपण प्राप्त केल्यानंतर आपल्या आयुष्यातील प्राधान्यक्रम, उद्दिष्टे आणि दिशा याविषयी काही ना काही विचार केला अशी व्यक्ती तर त्याचे मूल्यमापन करण्यास उत्सुक असतेच. सध्याच्या, व्यक्तीचे आयुर्मान काहीसे वाढले असल्याच्या, वातावरणात ७५ वर्षांचे वय पूर्ण करीत असतानाही व्यक्ती सक्षम, सजग आणि स्वस्थ असण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे आत्मचरित्र लिहो वा न लिहो, वयाच्या या टप्प्यावर पोहोचणारी प्रत्येक व्यक्ती मनाशी याबाबत संवाद करीत असतेच. सामान्यत ६५-७० वर्षांचे वय होईपर्यंत व्यावसायिक-पारिवारिक जीवन संपन्न झालेले असते. 'स्वांत सुखाय' जगण्याला अनुकूल परिस्थिती उपलब्ध असते. विचारी व्यक्ती अलिप्ततेच्या (निवृत्तीच्या नव्हे) मार्गाकडे वळण्याचा अधिक गंभीरपणे विचार करू लागते.

सतीश मराठे आज पंचाहत्तरीच्या या टप्प्यावर कमी अधिक फरकाने याच विचार तरंगांचा अनुभव घेत असतील. जीवनात कसोशीने पाळावयाची वर्तनसूत्रे, विचार आणि व्यवहार, व्यावसायिक, कौटुंबिक आणि व्यक्तिगत विश्वातील वावर आणि सामाजिक कामाला अग्रक्रम देण्याचा आग्रह इत्यादी सर्व गोष्टीसंदर्भात आपल्या भोवती निर्माण केलेल्या छोट्या विश्वावर नेमक्या कोणत्या संस्कारांचा ठसा राहिला? मराठे यांच्या संदर्भात या प्रश्नाचा मागोवा घेतला तर, अतिशय स्पष्टपणे उत्तर मिळते, विद्यार्थी परिषद आणि मुख्यतः प्रा. यशवंतराव केळकर!

विद्यार्थी परिषदेची वैचारिक भूमिका कार्यपद्धती आणि कार्यकर्त्या निर्माण या तीनही पैलूंची जडणघडण करणे आणि संघटनेच्या नित्य व्यवहारातून ते पैलू व्यक्त होत राहावे आणि कार्यकर्त्यांच्या अंतरंगातही झिरपावे याची बारकाईने काळजी घेणे हे यशवंतराव केळकर यांच्या दृष्टीसमोरचे सर्वोच्च प्राधान्याचे काम होते. एखाद्या बारीक परंतु भरगच्च वीण असलेल्या वस्त्रा सारखे हे तीनही पैलू त्यांनी अत्यंत कुशलतेने संघटनेला आकार देताना त्यामध्ये दृढमूल केले. संघटनेच्या पातळीवर सामूहिक चिंतन, हेतूपूर्ण कार्यक्रम आणि निखळ लोकशाही निर्णय प्रक्रिया यांची आणि कार्यकर्त्यांच्या बाबतीत प्रगल्भ मन, व्यापक दृष्टिकोन आणि स्वच्छ ध्येयासक्त व्यवहार यांची घट्ट रुजवात करणारी अनुपम कार्यपद्धती त्यांनी विकसित केली.

कार्यशैली विषयक विवेचनात प्रा. यशवंतराव छोट्या बैठकी - कार्यक्रमापासून





थेट जीवनक्रमाबाबतच्या मांडणीपर्यंत सर्व स्तरात नियोजनाला अग्रक्रम देण्याचे, अतिशय सूक्ष्म विचारावर आधारित परिपूर्ण नियोजन करण्याचे मार्गदर्शन करीत.म राठे यांनी या मार्गदर्शनाचा ठळक ठसा आपल्या विचार आणि व्यवहारात उतरविला असे म्हणायला हवे. विद्यार्थी परिषदेचे काम करीत असताना त्या नियोजन- कुशलतेचा अवलंब त्यांनी केलाच; शिवाय स्वतःच्या व्यक्तिगत जीवनातील प्राधान्यक्रमांची मांडामांड करतानाही त्याच नियोजन पद्धतीची कास त्यांनी धरलेली दिसते.

योग्य वेळी विद्यार्थी परिषदेच्या कामातून मुक्त होऊन अन्य क्षेत्रातील सहभागाचा विचार मराठे यांनी केला. आणीबाणीमुळे तो लांबला, मात्र त्यानंतर पुन्हा लगेचच त्याचा पाठपुरावा त्यांनी केला आणि समोर आलेल्या पर्यायांपैकी सहकार क्षेत्रात काम करण्याचा पर्याय निवडला. 'नियोजन करताना पुढच्या एक-दोन वर्षांचा नव्हे तर आगामी ३०-४० वर्षांचा विचार करून जीवनातले अग्रक्रम नक्की करावेत.' हा यशवंतरावांचा विचार डोळ्यासमोर ठेवूनच सहकार भारती या संस्थेच्या निर्मितीपासूनचे काम त्यांनी स्वीकारले. तिथून पुढच्या आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर त्यांनी जे निर्णय घेतले आणि कामे केली, त्याकडे पाहताना दोन-तीन गोष्टी ठळकपणे जाणवतात. एक: चरितार्थाचा (करिअर हा शब्द त्या काळात फारसा प्रचलित नव्हता) विचार करतानाही सामाजिक बांधिलकीची जाणीव नजरेआड होऊ दिली नाही, दोन: नवनव्या जबाबदाऱ्या स्वीकारताना त्यांच्यातील जोखीम, आव्हानात्मकता जाणीवपूर्वक अंगावर घेतली आणि तीन: त्या आव्हानांना सामोरे जाताना, आक्रस्ताळ्या संघर्षशीलतेचा नव्हे, तर सकारात्मक कार्यवाहीचा (Affermative Action) दृष्टिकोन स्वीकारला, जपला.

एका मोठ्या सरकारी बँकेतील अधिकार पदावरील नोकरी मराठे यांनी सोडली, ती एका, परिवारातील छोट्या सहकारी बँकेची जबाबदारी घेण्यासाठी. त्यानंतरही परिवारातल्याच दुसऱ्या सहकारी बँकेच्या मुख्याधिकारी पदाचा भार त्यांनी अंगावर घेतला. या दोन्ही प्रसंगांच्या काळात नागरी सहकारी बँका वेगवेगळ्या समस्यांना तोंड देत होत्या, तर दुसऱ्या बाजूने सतीश मराठे यांनी सहकार भारती या संघटनेची धुराही आपल्या हाती स्वतःहून घेतली होती. पुढे युनायटेड वेस्टर्न बँक या खाजगी बँकेचे अध्यक्षपद स्वीकारण्यास ते पुढे सरसावले तेव्हा तर, ती बँक रिझर्व्ह बँकेच्या लेखी बरखास्तीच्या छायेखाली आलेली होती. तीन वर्षे पर्यंत त्यांनी बँकेचे आर्थिक स्थिती रिझर्व बँकेच्या निकषानुसार सुधारण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. विविध आघाड्यांवर बँकेची स्थिती सुधारली ही परंतु ती सुधारणा रिझर्व्ह बँकेच्या निकषांच्या पूर्तीची पातळी मात्र गाठू शकली नाही. परिणामी, अखेर बँकेचा परवाना रद्द होऊन ती आयडीबीआय या बँकेत विलीन करण्यापासून ते रोखू शकले नाहीत. अखेर युनायटेड वेस्टर्न बँक विलीनीकरण झाले, त्याबद्दलचा दोषारोपही मराठे यांच्यावरच ठेवणारे हेत्वारोप हितसंबंधी गटांकडून सूचित करण्यात आले, त्यावर स्पष्ट परंतु संयमित उत्तर देणाऱ्या मुलाखती बिझीनेस स्टँडर्ड सारख्या आर्थिक क्षेत्रातील प्रतिष्ठित माध्यमांनी प्रसिद्ध केल्या. आणि त्याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे, पुढे रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डावर संचालक या नात्याने निवड होण्यासाठीच्या कठोर छाननीमध्येही युनायटेड वेस्टर्न बँकेसकट बँकिंग क्षेत्रातील त्यांच्या एकूण योगदानाबाबतचा सकारात्मक भावच बाळगला गेला. २०१८ साली तर त्यांची रिझर्व बँकेच्या पदी निवड झालीच; शिवाय त्या चार वर्षांची मुदत समाप्त झाल्यानंतर २०२२ साली पुन्हा त्याच पदावर त्यांची स्थिर नियुक्ती झाली. अशा प्रकारे सलग दुसऱ्यांदा रिझर्व बँक संचालक म्हणून निवड झाल्याची उदाहरणे विरळाच आहेत हे लक्षात घ्यायला हवे. याशिवाय नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन, नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, नॅशनल हाऊसिंग बँक, नॅफकॅब यासारख्या, सहकार क्षेत्रातील प्रतिष्ठित संस्था, (सरकारी निमसरकारी व खाजगी) यंत्रणांवर सल्लागार सदस्य या नात्याने त्यांना निमंत्रित करण्यात आले. त्या क्षेत्रात सतत व्यस्त राहून भरीव योगदान देत असतानाच, प्रगती प्रतिष्ठानसारख्या आदिवासी क्षेत्राच्या सेवेत मग्न असणाऱ्या स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी पंधरा वर्षे जबाबदारी सांभाळली.

सतीश मराठे आता वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहेत मात्र या वाढत्या वयाचा त्यांच्या चित्तवृत्तींवर सक्रियतेवर आणि ताजेपणावर कोणताच विपरीत परिणाम दिसत नाही आज त्यांचे अभिष्टचिंतन करत असताना. त्यांना शुभेच्छा देत असताना 'तुमच्या या सदैव अद्ययावत राहणाऱ्या, सदाहरित चित्तवृत्तींचा लाभ आम्हा सर्वांनाही होत राहो' अशी प्रार्थना करावीशी वाटते. शुभम भवतु..!



# सहकार भारती आणि सतीश मराठे एक अतूट नाते

**अभ्यासपूर्ण विषय ठेवणे, प्रत्येकाशी सौहार्दपूर्ण वागणं, सहज संवाद साधण्याची किमया, प्रचंड स्मरण शक्ति, साधेपणा, वागण्यातली सहजता, टापटीपपणा, एखाद्या विषयाचा पाठपुरावा करणं या सर्व गोष्टी मा. सतीशजींना अवगत आहे, अशा त्यांच्या या बहुगुणी व्यवहारांमुळे संपूर्ण देशभरात त्यांनी अनेक कुटुंबात एक आदराचे स्थान निर्माण केले आहे.**



दिलीप पाटील

मा. श्री. सतीशजींनी वयाची पंच्याहत्तरी गाठली हे सहकार सुगंधचे संपादक श्री. भालचंद्र कुलकर्णी यांच्या भ्रमणध्वनीवरील संदेशावरून कळले. मा. सतीशजी व वय वर्ष ७५ हे अजुनही न पटण्यासारखे) त्यांचा अमाप उत्साह, प्रवासाचा सपाटा, तरतरीतपणा चेहऱ्यालरील टवटवीतपणा पाहिल्यावर असं कोण म्हणेल की ते ७५ वर्षाचे झालेत? मा.सतीशजींच्या पंच्याहत्तरीनिमीत मनापासून अभिष्टचिंतन ।

आणिबाणीच्या कठीण पर्वानंतर देशाशील हुकुम शाही प्रवृत्तीविरुद्ध लढणाऱ्या देशभरातील सर्व स्वयंसेवी संस्था मोकळेपणानं श्वास घ्यायला लागल्या अर्थात आणिबाणीच्या बंदीकाळात या राष्ट्र प्रेमी संघटना गुप्तपणे काम करीतच होत्या. पण आता सर्व संघटनांचे उघडपणे व जोरात काम सुरु झाले. १९७७ च्या जुलै महिन्यात धरणगाव महाविद्यालयात नेहमीप्रमाणे वर्गात जात असतांना वर्गमित्र श्री मोहन रावतोळे ने अ. भा. विद्यार्थी परिषदेची आपल्याला आजपासून सदस्यता मोहिम राबवायची आहे, सदस्यतेची पावतीपुस्तके आली आहेत असे म्हणत पुस्तकांचा गठ्ठा माझ्या हातात सोपवला त्यातील एक पुस्तक काढुन वाचु लागलो, त्या पावत्यांवर कोषाध्यक्ष म्हणून सही होती ती मा. सतीश मराठे यांची (ती सही म्हणजे आमची मा. सतीशजींची पहिली भेट । त्या पुस्तकात एका छोट्या कागदावर





सदस्यता कशी करावी ? हिशेब कसा ठेवावा ? याविषयी स्वहस्ताक्षरात लिहीलेले सुचना वजा टिपण! त्या मजकुराची सुरुवात होती ती 'आत्मिय कार्यकर्ता बंधु' असे संबोधुन; हे टिपण, हे संबोधन वाचुनच यापूर्वी कधीही न भेटलेल्या मा श्री० सतीशजींविषयी आदराने, आत्मीयतेने हृदयात जागा निर्माण केली- आम्ही सर्व कार्यकर्त्यांनी धूमधडाक्यात सदस्यता केली- महाविद्यालयातील मा प्राचार्य, दोन प्राध्यापक सोडता सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी- विद्यार्थीनी अशा सर्वांना अभाविपचे सदस्य करून घेतले; प्रत्येकाला पावती देतांना मा.सतीशजींची सही आत्मीय भाव वाढवणारी ठरली.पुढे प्रदेश अभ्यासवर्गात मा सतीशजींची प्रत्यक्ष भेट झाली, त्यांच्या सहीप्रमाणेच नीटनेटका, स्वच्छ त्यांचा वेष, केसांचा व्यवस्थितपणा, हास्यमुद्रेने प्रत्येकाशी संवाद, अन् हा संवाद म्हणजे जणुकाय गेल्या

१०/१५ वर्षापासून ओळख असल्यासारखा। अभ्यासवर्गात प्रत्येक सत्रात वेळे आधी ५ मिनीटे येवून सभागृहांतील बैठक व्यवस्था, फोटो, हार न्याहाळणार व सत्र वेळेवर सुरु व्हावे म्हणून काळजी करणारे मा० सतीशजी कार्यरत असत.

कार्यकत्याने कोऱ्या पाकिटासारखे असावे, संघटनेने जो पता टाकला त्याप्रमाणे काम करावे असे मांडणाऱ्या मा. सतीशजींकडे पुढे सहकार क्षेत्रात काम सुरू करावे असा विषय आला- सहकारी कार्यकत्यांच्या सामूहिक चिंतनातून व स्व.लक्ष्मणरम इनामदारांच्या मार्गदर्शनातून '११ जानेवारी, १९७९ रोजी सहकार भारती या संस्थेची स्थापना करण्यात आली! बिना सहकार नहीं उध्दार' हे वाक्य सर्वांना परिचीत होते; या वाक्याच्या आधी 'बिना





संस्कार नही सहकार, बिना सहकार नहीं उध्दार' असे घोषवाक्य घेवून म्हणजेच सहकार भारतीच्या स्थापनेचा हेतु समाजा समोर मा-श्री सतीशजींनी ठेवला व कामकाजाला सुरुवात केली. डोक्यावर बर्फ व तोंडात साखर आधीपासूनच श्री. सतीशजींकडे होती, पुढे पायाला भिंगरी लावून या माणसानं सहकार भारतीच्या कामा साठी, विस्तारासाठी, विकासासाठी सारा देश पालथा घातला.

संघटना वाढीसाठी सोबत आपल्या

अभ्यासपूर्णमांडणीतुन शासन दरबारी विधायक दबदबा निर्माण करण्यात मा. संतिषजी यशस्वी ठरले. सरकारात कुणीही असो, सहकार क्षेत्रात एखादा निर्णय घेतांना सहकार भारतीला आधी विचारा असे त्या काळी जे जे कुणी सहकार मंत्री व उच्चपदस्थ अधिकारी होते ते म्हणू लागले, पण यामुळे आपण हवेत न जाता एकेका व्यक्तिला भेटून त्याला सहकार भारतीशी जोडण्याचं काम श्री सतिवजी अव्याहतपणे करत असत. त्याकाळी लेखन सामग्री, पत्रव्यवहार, संपर्क यासाठी आतासारखी कोणतीही अद्ययावत यंत्रणा नसताना या सर्व भूमिका करणारेश्री सतीशजी अनेकांनी अनुभवले आहेत. दिलेली जबाबदारी कर्तव्य म्हणून स्विकारंण व ती पूर्ण करण्यासाठी आनंदाने काम करणं, पहिल्याच भेटीत समोरच्या माण साला आपले से करणं ही मा.श्री. सविषजींची हातोटी । सहकार - भारतीच्या कार्यासाठी संपूर्ण देशातील प्रत्येक राज्यात व प्रत्येक जिल्ह्यात अनेकदा प्रवास केल्यामुळे मा श्री सतीशजींनी एक मोठा गोतावळा जमा केलाय व हा गोतावळा स्वतःभोवती केंद्रित होणार नाही, तर तो संघटनेशी जोडण्याचं अजोड असं काम त्यांनी केलंय. सहकार भारतीच्या कामाच्या





निमीत्ताने केंद्रिय स्तरावरील सहकार क्षेत्रासाठी काम करणा-या शासकीय शिखर संस्थामधील अधिकारी व श्री सतीशजी यांच्यात निर्माण झालेला स्नेह, संबंध वाखाणण्याजोगा आहे. या स्नेहामुळे जोडले गेलेले उच्चपदस्थ अधिकारी सेवानिवृत्तीनंतर सहकार भारतीच्या कामात सक्रिय झाले, सहकार भारतीचे पदाधिकारी म्हणून त्यांना काम करतांना आपण पहात आहोत..

अभ्यासपूर्ण विषय ठेवणे, प्रत्येकाशी सौहार्दपूर्ण वागणं, सहज संवाद साधण्याची किमया, प्रचंड स्मरण शक्ति ,साधेपणा, वागण्यातली सहजता, टापटीपपणा, एखाद्या विषयाचा पाठपुरावा करणं या सर्व गोष्टी मा. सति षजींना अवगत आहे, अशा त्यांच्या या बहुगुणी व्यवहारांमुळे संपूर्ण देशभरात त्यांनी अनेक कुटुंबात एक आदराचे स्थान निर्माण केले आहे.

सरकारच्या अनेक शिखर संस्थांच्या विवीध समित्यां वर काम करण्याची त्यांना मिळालेली संधी त्यांनी पर्वणी मानली व काम करतांना तेथे एक आदर्श ठसा त्यांनी उमटवला आज रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या संचालकपदी दुसऱ्यांदा त्यांची नियुक्ती झाली, या मोठ्या पदाचा त्यांना कधी गर्व वाटला नाही, बडेजावपणा करावा असे वाटले नाही हा त्यांचा साधेपणाच संपर्कात आलेल्या प्रत्येकाला आपलंसं करतो, मग त्याला ना वयाची सीमा असते ना पदाची !

संघटना केवळ वाढवायची नाही तर संघटनेचा सर्वार्थाने विकास करावा हे अभाविपमध्ये प्रत्यक्ष कृतीम ध्ये उत्तरविण्यासाठी सतत ध्यास ठेवणारे स्व० प्रा० यशवंतराव केळकर यांचा अनेक वर्ष मा सतीशजींना सहवास लाभला आहे; त्यामुळे त्यांनी सहकार भारतीत काम करतांना तोच कित्ता गिरवला आहे, अशा बहुआयामी, बहुगुणी श्री सतीशजींना समर्थपणे साथ मिळाली ती त्यांच्या धर्मपत्नी सौ० भारतीवहिनींची ! घरी येणाऱ्या प्रत्येकाचे हसतमुख स्वागत, आदरातिथ्य, आपुलकीने चौकशी, नेहमी कार्यकत्याचा उत्साह वाढेल असा व्यवहार यात सौ. भारतीवहिनींचाही हातखंडा आहे. श्री.सतीशजींचा प्रवास सुखकर होण्यासाठी सौ. भारतीवहिनी तत्पर असतात, अनेक कार्यकर्त्यांचे न कळत पालकत्व निभावणाऱ्या या जोडप्याचे अभिनंदन व अभिष्टचिंतन ! त्यांचे ममत्व यापुढेही सर्वांना मिळत राहो यासाठी त्यांना दोघांनाही उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य लाभो ही प्रभुचरणी प्रार्थना।







# सहकाराचा कर्मयोगी

**एका सहकारी बँकेचा मुख्य कार्यकारी अधिकारी एका मोठ्या खाजगी बँकेचा अध्यक्ष होणे आणि त्यानंतर रिझर्व बँकेच्या संचालक पदावर सन्मानाने विराजमान होऊन तेथे सहकाराचा ठसा उमटवणे ही गोष्ट निश्चितच अभिमानास्पद आहे.**



**दिवाकर दामले**

मी १९९२ साली जनकल्याण बँकेच्या भांडुप शाखेत क्लार्क म्हणून कार्यरत होतो. मूलतः माझा स्वभाव बेदरकार आहे. करायचे बोलायचे ते थेट. एक दिवस आमचे ''मुख्य कार्यकारी अधिकारी'' शाखेला भेट देण्यासाठी आले.

सर्वसाधारणपणे मुख्य कार्यालयातून कोणी अधिकारी, उच्चपदस्थ आले की त्यांचा संवाद शाखाधिकाऱ्याशी होत असे.

यावेळी वेगळे घडले सुहास्यवदनी, वामनमूर्ती पण देहबोलीतून बुद्धीच्यातुर्य आणि विनम्रता दर्शविणारी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेली ''श्री मराठे सर'' ही व्यक्ती शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांशी अनौपचारिकपणे मोकळेपणाने संवाद करत होती हीच माझी आणि मराठी सरांची पहिली भेट.

माझा त्यांचा संवाद झाला तेव्हा त्यांनी मला काही अडचण आहे का? कामकाज कसे चालले आहे? वगैरे विचारले. त्यावेळी माझी आई खूप आजारी होती कामाच्या डबल वेळा तिची सेवा, माझे जाणे येणे यात माझी खूप तारांबळ होत असे. त्यांनी माझी अडचण समजून घेतली आणि मला सोयीस्कर ठिकाणी बदली करून दिली. या प्रसंगाने माझ्या मनात ''मराठे सर'' असे न होता ''माझे साहेब'' अशी एक कायमची छबी कोरली गेली.

पुढे त्यांची माझी जेव्हा जेव्हा भेट होत गेली तेव्हा त्यांनी माझे अचूक निरीक्षण केले आणि माझ्या बेदरकार, बेलगाम पण निष्ठावान प्रवृत्तीस योग्य वळण लावण्याचे काम केले. मी त्यांना कर्मयोगी मानतो. बँकेच्या उच्चस्थपदावर कार्यरत असताना त्यांनी सातत्याने संस्थेच्या विकासाचा विचार केला तसेच बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या हिताच्या अनेक गोष्टी केल्या. बँकेचे संचालक मंडळ आणि कर्मचारी यांच्यामधील अंतराचा उत्तम समतोल साधला. साहेबांच्या दूरदृष्टीमुळे बँकेचा विकास आणि विस्तार अत्यंत वेगाने झाला.

साहेब सातत्याने सहकाराशी जोडले गेले आहेत. बँकेच्या ठेवी वाढविताना पनवेल, पेण, अलिबाग, रत्नागिरी अशा ठिकाणच्या कमळ नागरी, कुंडलिका, चंपावती केशव स्मृती, आदर्श, जनकल्याण पतसंस्था कराड , स्वामी स्वरूपानंद, या व अशा अनेक पतपेढ्यांशी संपर्क वाढविला. तसेच छोट्या सहकारी बँकाही लक्षात घेतल्या. त्यांच्या ठेवी बँकेची जोडून त्या पतपेढ्यांचा आणि पर्यायाने बँकेचा विस्तार वेगाने होण्यात सहाय्य झाले.

या संपर्क अभियानात त्यांनी मला प्रामुख्याने जबाबदारी सोपविली. माझ्यातील धडाडीला योग्य वळण दिले आणि माणूस जोडण्याचे अचूक प्रशिक्षण देत माझ्यातील सुप्त बँकरला घडविले. साहेबांच्या मार्गदर्शनाखाली



आमच्या बँकेची रेल्वे आणि बसेस वर जाहिरात झळकली तसेच आकाशवाणीवरही वाजली. सहकारी क्षेत्रात अशा जाहिराती करणारी आमची पहिली बँक ठरली. या क्षेत्रातही साहेबांनी मला जबाबदारी दिली व हे क्षेत्र कसे हाताळावे हे समजावून सांगितले.

मला नवल वाटते की जनकल्याण सहकारी बँकेचे नाव सर्वत्र गाजत होते, साहेब नवनवीन प्रयोग करून यशस्वी होत होते पण एक स्वच्छ कारभार करणारा सर्वो दय माणूस म्हणून त्यांचे पाय सातत्याने जमिनीवरच होते.

याचेही नकळत संस्कार त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या सहकार्यांवर होत होते ते खऱ्या अर्थाने कर्मयोगी होते आणि आहेत.

मला उत्तम अधिकाऱ्याचे कौशल्य शिकवत त्यांनी बँकेत शाखाधिकारी होण्याची संधी दिली एवढेच नव्हे तर दुसऱ्या मोठ्या बँकेत भरारी घेण्यास प्रोत्साहन दिले.

आज शामराव विठ्ठल सहकारी बँकेत यशस्वीपणे काम करत असताना मला साहेबांची शिकवण सातत्याने आठवते.

ठेवी संकलन, प्रॉपर्टी क्षेत्र,जाहिरात क्षेत्र, वसुली क्षेत्र अशा चौफेर ठिकाणी त्यांनी मला काम करण्याची संधी दिली सहकार्य केले आणि मार्गदर्शनही केले.

मी असा हा एकटाच नाही तर जनकल्याण बँकेतील अनेकांना त्यांनी प्रत्येकाचा वकूब ओळखून घडविले.

एका सहकारी बँकेचा मुख्य कार्यकारी अधिकारी एका मोठ्या खाजगी बँकेचा अध्यक्ष होणे आणि त्यानंतर रिझर्व बँकेच्या संचालक पदावर सन्मानाने विराजमान होऊन तेथे सहकाराचा ठसा उमटवणे ही गोष्ट निश्चितच अभिमानास्पद आहे.

असे आगळे वेगळे उदाहरण विरळेच!

साहेब वयाची ७५ वर्षे पूर्ण करत आहेत. त्यांना उत्तम आरोग्य लाभू दे आणि त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांना त्यांचे असेच मार्गदर्शन मिळत राहू दे. सहकाराचा झेंडा भक्कम मेढीवर सदैव फडकत राहू दे ही स्वामी चरणी प्रार्थना.

# My memories with respected Shri Satish ji

**At his level degree of simplicity is very high. He continued to attend our various functions and respective minister used to recognise his presence in whole crowed.**



Dr Kishore Supekar

I still remember after joining as MD, NCDFI, Anand I got in touch with him due to late Shri Subhash ji Mandge sir from Indore. Then I had good no of opportunities to participate in various programs of sahkar bharti in Maharashtra and Delhi. This had an everlasting impression about his personality on me and it was a great motivational factor for my splendid performance at NCDFI and sector.

I always felt that despite his various prestigious positions in various outfits including as RBI Director I found typical "Zolachap RSS Karyakarta with no Ego and greater degree of commitment and dedication to the objectives with great team work. Many times he offered to travel by train which is very special attribute I felt. At his level degree of simplicity is very high. He continued to attend our various functions and respective minister used to recognise his presence in whole crowed.

I could have greater access to various ministries for Toing the NCDFI agenda due to his mentorship. I always felt that he become the public asset.

We wish him happy and healthy life ahead and u please continue to be guiding force for all of us.

# सहकारातील एक वटवृक्ष

**सहकार भारतीच्या पदाधिकाऱ्यांमुळे गोव्यात पंचवीस वर्षांपूर्वी गोवा सहकार भारतीची स्थापना झाली. त्यामुळे सतीशजींची व माझी भेट अनेक कार्यक्रमात व्हायची. सहकार भारतीची जवळजवळ सगळीच त्रैवार्षिक अधिवेशने मी उपस्थित राहिलेलो आहे. त्या अधिवेशनात त्यांचे उपयुक्त मार्गदर्शन व्हायचे. महाराष्ट्राकडून मला सहकाराविषयी खूप शिकायला मिळाले. त्यात सतीशजींकडून खूप मोठे मार्गदर्शन लाभले ते मी विसरू शकत नाही.**



प्रकाश वेळीप

सतीश मराठे व माझी कशी ओळख झाली नक्की आठवत नाही. पण कमीत कमी आमची मैत्री पस्तीस एक वर्षांची जुनी आहे. मी गोव्याचा आमदार होतो तेव्हा ते सहज आमच्याकडे यायचे आमची भेट व्हायची. अनेक विषयावर चर्चा करायचे व जायचे. त्याच्यानंतर आम्ही १९९२ रोजी 'केपे अर्बन पतपेढीची' स्थापना केली तेव्हापासून त्यांचा आमच्याशी जास्ती संबंध आला. अनेक विषयावर आम्ही त्यांचे मार्गदर्शन घेत होतो. आजही आम्हाला कुठल्याही विषयावर मार्गदर्शन लागले तर ते आम्हाला आजही देत आहेत. हा त्यांचा स्वभाव आम्हाला जास्ती आवडायचा तसा ते सर्वांशी प्रेमाने वागतात आपुलकीने सगळ्यांची चौकशी करतात असे वागणारे आज खूप कमी होत चाललेय. या धावपळीच्या जगात कुणालाही दुसऱ्यासाठी जास्ती वेळ नसतो पण सतीशजीकडे तसे नाही. त्यांच्याकडे दुसऱ्यासाठी नेहमी वेळ असतो. ते कितीही बिझी असले तरी ते मागाहून मुद्दाम वेळ काढतात हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

त्याच्या नंतर माझी गोवा आणि महाराष्ट्रात ॲपेक्स बँकेवर संचालक म्हणून नेमणूक झाली. या मागेसुद्धा त्यांचीच शिफारस असणार. कारण आता गोव्यामध्ये आम्ही दोन सहकारी संस्था उभ्या केल्या होत्या. दुसरी आहे आदर्श कृषी सहकारी संस्था, बाब्डी गोवा या संस्थेलासुद्धा त्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्या बँकेचे प्रधान कार्यालय नरीमन पॉईंट, मुंबई येथे होते. ते त्या काळी ठाणे जनता बँकेचे 'सीईओ' होते. तिथे आम्ही दर दोन महिन्यांनी भेटत होतो. ती एक चांगल्या प्रकारे बँक चालत होती.

काही वर्षांनी शासनानी ती बँक पुढे बंद केली त्यामुळे सतीशजी दर दोन महिन्यांनी भेट व्हायची ती बंद झाली पण आमचे भेटणे चालूच होते.

पुढे मग त्यांच्या व अन्य सहकार भारतीच्या पदाधिकाऱ्यांमुळे गोव्यात पंचवीस वर्षांपूर्वी गोवा सहकार भारतीची स्थापना झाली. त्यामुळे त्यांची व माझी भेट अनेक कार्यक्रमात व्हायची. सहकार भारतीची जवळजवळ सगळीच त्रैवार्षिक अधिवेशने मी उपस्थित राहिलेलो आहे. त्या अधिवेशनात त्यांचे उपयुक्त मार्गदर्शन व्हायचे. महाराष्ट्राकडून मला सहकाराविषयी खूप शिकायला मिळाले. त्यात सतीशजींकडून खूप मोठे मार्गदर्शन लाभले ते मी विसरू शकत नाही.

मधल्या वेळेत स्व. मनोहर पर्रीकर मुख्यमंत्री असताना त्यांच्या मंत्रीमंडळात मला सहकार मंत्री होण्याची संधी मिळाली. त्या सतरा महिन्याच्या कालावधीत महाराष्ट्रात अनेक कार्यक्रमात उपस्थित राहण्याची संधी मिळाली. बहुतेक वेळेला सतीशजी त्या कार्यक्रमांना उपस्थित असायचे



अशा प्रकारे सतीशजी आणि माझी अतूट मैत्री चालू आहे.

गोव्यातील आमच्या सहकारातील कुठल्याही मोठ्या कार्यक्रमात आम्ही त्यांना खास बोलावत होतो. त्यांही कधी आम्हाला ना म्हटले नाही.

फेब्रूवारी २०२४ मध्ये पर्वशी-गोवा येथे तीन दिवसीय 'क्रेडिट सेलचे' भव्य अधिवेशन संपन्न झाले. जवळजवळ चार हजार क्रेडिट संस्थांमध्ये काम करणारे संचालक संबंध देशातून उपस्थित होते. हे अधिवेशन संपन्न करण्यासाठी सतीशजींचे उपयुक्त मार्गदर्शन आम्हाला खूप उपयुक्त ठरले.

आमच्या दोन्ही संस्थांच्या 'केपे अर्बन पतपेढी' व 'आदर्श कृषी सहकारी संस्था' यांच्या रौप्य महोत्सवाला त्यांना आम्ही आवर्जुन बोलावले होते. त्यांचे सहकारातील गाढे ज्ञान देशातील व पर्यायाने गोव्यातील सहकार कार्यकर्त्यांना खूप लाभदायक ठरले आहे. आजही ते आपल्या वयाची पर्वा न करता न थकता सहकारासाठी देश, विदेशात प्रवास व मार्गदर्शन करीत असतात.

माझ्या अनेक वाढदिवसाच्या कार्यक्रमांनासुद्धा त्यांना आम्ही प्रेमाने बोलावत होतो व ते तेवढ्याच अगत्याने यायचे. गोव्यातील सहकार भारतीच्या वाढीसाठी सतीशजी व उदयजी यांचे खूप मोठे योगदान आहे.

त्यांची अनेक ठिकाणी नेमणूक झाली, मग ती 'रिझर्व्ह बँक' असो किंवा देशातील इतर मोठ्या सहकार संस्थांवर असो, हे त्या संस्थांचे मोठेपण आहे. आपली साधी सरळ प्रवृत्ती व सहकारासाठी झोकून दिलेल एक आगळे वेगळे व्यक्तीमत्व म्हणजे 'सतीश मराठे.' ते सहकारातील एक 'वटवृक्ष' आहेत. त्यांच्या पंच्याहत्तरव्या वाढदिवसाला माझ्या लाख शुभेच्छा. त्यांना उदंड निरोगी आयुष्य लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**- प्रकाश शंकर वेळीप**
माजी सहकार मंत्री, गोवा
९८२२१२१७४०

---

# उत्तुंग व्यक्तिमत्त्व

**''सतीश मराठे'' हे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या कार्यक्षेत्राचा परिघ विस्तृत आहे.**



**सौ. रेखा लिमये**

साहेबांशी जेव्हा नव्यानेच ओळख झाली तेव्हा सहकार भारती, संस्कार भारती, सेवा भारती, छात्र भारती, या आणि अशा अनेक शब्दांची मांदियाळी त्यांच्याकडून ऐकली. कालांतराने त्यांच्या पत्नीचे नाव ''भारती'' आहे हे कळले तेव्हा आम्ही हलक्या फुलक्या वातावरणात साहेबांना म्हणत असू की, काम करताना तोंडात सतत पत्नीचे नाव. अमुक भारती वा तमुक भारती.

पण खरोखरच साहेबांच्या या यशस्वी वाटचालीमध्ये त्यांची सहचारिणी आमच्या ''भारती वहिनी'' यांची अबोल पण कृतिशील भक्कम साथ प्रशंसनीय आहे.

''सतीश मराठे'' हे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या कार्यक्षेत्राचा परिघ विस्तृत आहे. मी केवळ बँकेच्या कार्यकाळात स्वतः अनुभविलेले विचार सादर केले आहेत.

मराठे साहेबांना १ फेब्रुवारी २०२५ या दिवशी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्याना माझा सविनय नमस्कार आणि उदंड शुभेच्छा. त्यांना निरामय आरोग्य लाभो आणि त्यांची सहकार क्षेत्रातील सेवा अविरत चालू राहो ही श्रीकृष्ण चरणी मनापासून प्रार्थना.





# सहकाराला सकारात्मक दिशा देणारे व्यक्तिमत्त्व

आदरणीय सतीशजी ‘अमृत महोत्सवी’ वर्षानिमित्ताने आपले मन:पूर्वक अभिनंदन! भावी आयुष्याकरीता उत्तम आरोग्यासाठी परमेश्वराकडे प्रार्थना.

एक सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटुंबातील एक तरूण शिक्षण घेतल्यानंतर संघ विचारांशी जोडला जातो. तो प्रवास सुरू झाल्यानंतर अखंड चिंतन, वाचन, कार्यकर्त्यांचे सानिध्य याद्वारे जी झेप घेतो. ती सर्वार्थाने अचंबित करणारी असते.

सार्वजनिक उपक्रमातील एका बँकेमध्ये नोकरी केल्यानंतर ‘जनकल्याण’ बँकेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सूत्र हाती घेतली. त्यानंतर जनकल्याण बँकेची घोडदौड सुरू झाली, Schedule Bank असा दर्जा मिळाला. अर्थकारण करीत असताना जनसामान्यांच्या विचार करून असंख्य वंचितांना भरभक्कम आधार देण्याचे काम व विचार सातत्याने केला गेला. सहकारी बँकेचा आत्मा लक्षांत घेऊन अर्थ विषयांत जेजे मागे राहिलेले होते त्यांना प्राधान्याने सहाय्य करून त्यांना मानाचा सामाजिक दर्जा देण्याचा यथायोग्य प्रयत्न केला.

आजच्या भाषेतील Start Ups ची सुरुवात त्यांनीही केली. अनेक नवोदित तरुणांना बँकेद्वारे सक्षम करून त्यांना उत्तम व्यावसायिक, उद्योजक बनविण्याचा प्रयत्न करून त्यांना उत्तम व्यावसायिक, उद्योजक बनविण्याचा प्रयत्न करून याद्वारे राष्ट्रीय संपत्तीमध्ये खूप मोलाचे योगदान दिले.

बँकेचा विकास करताना असंख्य सामाजिक काम करणाऱ्या संस्थांना मदतीचा हात ही वेळोवेळी पुढे केला. महाडच्या जनकल्याण रक्तपेढीच्या मदतीसाठी प्रख्यात गायिका श्रीमती आशाताई भोसले यांच्या कार्यक्रमास जनकल्याण बँकेतर्फे आपण केलेले सहाय्य रक्तपेढीच्या सर्व कार्यकर्त्यांना अखंड स्मरणात राहील.

सहकार भारतीची स्थापना व त्यानंतरची सर्व प्रगती ही आपल्या कार्यकर्तृत्वाची एक मोठी देणगी दिली. नवीन विचार रुजवताना जे असामान्य कष्ट घ्यावे लागतात ते सर्व लक्षांत घेताना आपले मोठेपण प्रकर्षाने अधोरेखित होते. कोणतीही चळवळ अथवा संस्था जन्माला आल्यानंतरचा प्रवास हा प्रामाणिक, वैचारिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यकर्त्यांच्याद्वारे होतो हे वैश्विक सत्य डोळ्यासमोर ठेऊन त्यासाठी देशभर सतत प्रवास करून समाजातील प्रत्येक स्तरामधील कार्यकर्त्यांची गुणवत्ता हेरून त्यांना आपल्या नैसर्गिक वागण्यामधून संस्कारित करण्याचा प्रयास अखंड करत आहात. देशाच्या अर्थविषयक विचारांमध्ये एक सकारात्मक दिशा देणारी संस्था म्हणून सहकार भारतीचे स्थान सदा सदैव अढळ ताऱ्यासारखे कायम राहणार आहे.

**नवीन विचार रुजवताना जे असामान्य कष्ट घ्यावे लागतात ते सर्व लक्षांत घेताना आपले मोठेपण प्रकर्षाने अधोरेखित होते. कोणतीही चळवळ अथवा संस्था जन्माला आल्यानंतरचा प्रवास हा प्रामाणिक, वैचारिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यकर्त्यांच्याद्वारे होतो हे वैश्विक सत्य डोळ्यासमोर ठेऊन त्यासाठी देशभर सतत प्रवास करून समाजातील प्रत्येक स्तरामधील कार्यकर्त्यांची गुणवत्ता हेरून त्यांना आपल्या नैसर्गिक वागण्यामधून संस्कारित करण्याचा प्रयास अखंड करत आहात.**



किशोर बागडे



# सहकारातील अखंडपणे वाहणारा निर्झर झरा...

**सहकार भारतीच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचे मोलाचे कार्य सतीशजींनी केले. सहकार क्षेत्र सुसंस्कृत व सुदृढ व्हावे यासाठी ते मागील ४६ वर्षांपासून स्वतः ला झोकून देत कार्य करीत आहेत. सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री, राष्ट्रीय महामंत्री, राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय संरक्षक अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडत त्यांनी देशभरातील हजारो कार्यकर्ते सहकार भारतीशी जोडले.**



**विवेक दिनकर जुगादे**

आपल्या देशात सहकार हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून चालत आलेला आहे. अगदी इंग्रजांच्या काळातही सहकार होताच. मात्र देशाच्या स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात सहकार अधिक वेगाने वाढला हे सर्वश्रुतच आहे. सहकार क्षेत्राने उंच झेप घेत या देशाच्या अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा व गती दिली. आपल्या देशाची अर्थव्यवस्था सुदृढ व सक्षम करण्यासाठी सहकार क्षेत्राने मोलाची भूमिका बजावली. सहकार क्षेत्राचा हा विस्तीर्ण व्याप बघता हे क्षेत्र संघटित व संस्कारित व्हावे या उद्देशाने ११ जानेवारी १९७९ रोजी सहकार भारतीची स्थापना झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक स्व लक्ष्मणराव इनामदार हे सहकार भारतीचे संस्थापक होय. त्यावेळी जे काही मोजके कार्यकर्ते या संघटनेच्या स्थापनेमध्ये होते, त्यातील एक तेजस्वी व ध्येयवेडे नाव म्हणजे सतीश मराठे.... जे आजही सहकार क्षेत्रात एका निर्झर झऱ्याप्रमाणे कार्य करीत आहेत.

सतीशजींचा जन्म १ फेब्रुवारी १९५० रोजी झाला. सहकार भारतीच्या स्थापनेच्या वेळी त्यांचे वय केवळ २८ वर्षांचे होते. सतीशजींनी आज अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले असले तरीही त्यांची सहकारातील तपस्या ही तब्बल ५० वर्षांची आहे. ''बिना संस्कार नही सहकार... बिना सहकार नही उद्धार'' हे ब्रीदवाक्य घेऊन सहकार भारतीची घोडदौड आजही अविरतपणे सुरू आहे. सतीशजींचे सहकार क्षेत्रातील व सहकार भारती संघटनेमधील योगदान प्रचंड आहे. ज्यावेळी सहकार भारतीची स्थापना झाली, त्यावेळी सहकारामध्ये संस्काराचा अभाव होता. ''सहकार म्हणजे स्वाहाकार'' असेच जणू समीकरण होते. काही मोजके लोक सोडली तर सहकार हा व्यक्ती केंद्रितच होता. सहकारामध्ये संस्कार रुजवून सहकारी संस्थांना बळकटी निर्माण करण्याचे शिवधनुष्य सहकार भारतीने उचलले. त्यावेळी सतीश मराठे हे नाव अग्रेसर होते.

वाणिज्य व कायदा विषयात पदवी संपादन केलेले तसेच पत्रकारितेमध्ये भारतीय विद्या भवन येथून सुवर्णपदक मिळवीत पदविका प्राप्त केलेले सतीशजी एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. सकाळी कॉलेजमध्ये शिकून उदरनिर्वाहासाठी दिवसभर नोकरी करणारे सतीशजी एक अजातशत्रू व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या सामाजिक कार्याला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून सुरुवात झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरकार्यवाह मा स्व श्री मदनदासजी देवी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांचा व्यावसायिक प्रवास बँक ऑफ इंडिया पासून सुरू झाला. डोंबिवली नागरी सहकारी बँक व जनकल्याण सहकारी बँकेच्या





माध्यमातून त्यांचा सहकार क्षेत्रात प्रवेश झाला. पुढे युनायटेड वेस्टर्न बँकेचे (सध्याची आयडीबीआय बँक) ते अध्यक्ष झाले व त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे बँकेने नवी उंची गाठली. ते अनेक वर्ष नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे संचालक होते. नॅशनल कौन्सिल फॉर को-ऑपरेटिव ट्रेनिंगचे ते अनेक वर्ष कार्यलक्षी संचालक होते. नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडियाचे सुद्धा ते अनेक वर्ष संचालक होते. इंडियन बँक्स असोसिएशनचे सचिव म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला. पालघर जिल्ह्यातील जवाहर येथे प्रगती प्रतिष्ठानद्वारे चालविण्यात येणाऱ्या दिव्यांग शाळेचे देखील ते अनेक वर्ष अध्यक्ष होते.

सहकार भारतीच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचे मोलाचे कार्य सतीशजींनी केले. सहकार क्षेत्र सुसंस्कृत व सुदृढ व्हावे यासाठी ते मागील ४६ वर्षांपासून स्वतःला झोकून देत कार्य करीत आहेत. सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री, राष्ट्रीय महामंत्री, राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय संरक्षक अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडत त्यांनी देशभरातील हजारो कार्यकर्ते सहकार भारतीशी जोडले. आज संपूर्ण देशभरातील २८ राज्यांमध्ये व ७०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये जे सहकार भारतीचे कार्य सक्षमपणे उभे झाले आहे, त्याचा भक्कम पाया सतीशजींनी स्वतःला झिजवत रचला. सतत प्रवास करणे, नवनवीन सहकारी संस्थांना संघटनेशी जोडून घेणे, त्यांचे प्रश्न सोडवणे हा त्यांचा स्थायीभाव. शासनदरबारी सहकार भारतीला मानाचे स्थान मिळून देण्यात सतीशजींचा सिंहाचा वाटा आहे. भारत सरकारचे केंद्रीय सहकार मंत्री श्री अमित शहा व केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन हे सुद्धा वेळोवेळी अर्थसंकल्पाबाबत सतीशजींचे मार्गदर्शन घेत असतात. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी नवीन सहकार धोरण तयार करण्यासाठी गठित केलेल्या समितीमध्ये सतीशजींचा समावेश आहे. माजी केंद्रीय मंत्री श्री सुरेश प्रभू या समितीचे अध्यक्ष आहेत. सहकाराच्या सर्व आयामामध्ये सतीशजींचा गाढा अभ्यास आहे. बँकिंग सोबतच पतसंस्था, हाऊसिंग सोसायटी, मत्स्य व्यवसाय सोसायटी, बचत गट, विविध कार्यकारी संस्था, सहकारी ग्राहक भंडार अशा सहकाराच्या विविध प्रकोष्ठांना सतत त्यांचे मार्गदर्शन लाभत असते. आज त्यांच्या भगीरथ प्रयत्नांमुळे व संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे देशभरातील ५० हजाराहून अधिक संस्था सहकार भारतीशी जोडल्या गेल्या आहेत. आज आपल्या देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ''सहकारातून समृद्धी'' या संकल्पनेचा पाया सतीशजींनी ४७ वर्षांपूर्वी सहकार भारती संघटनेच्या माध्यमातून रचला.

सतीशजी मागील ५ वर्षांपासून भारतीय रिझर्व बँकेचे संचालक म्हणून कार्य करीत आहेत. सहकारी बँकांचा चेहरा म्हणून त्यांची भारतीय रिझर्व बँकेमध्ये ओळख आहे. देशभरातील बहुतांश नागरी सहकारी बँकांच्या संपर्कात ते असतात. त्याचबरोबर त्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी सतीशची नेहमीच अग्रेसर असतात. सहकारी बँकांच्या माध्यमातून समाजाची आर्थिक उन्नती कशी होऊ शकते हे भारतीय रिझर्व बँकेला पटवून देण्यासाठी त्यांची नेहमीच धडपड सुरू असते. आरबीआयचे संचालक असताना देखील आजही ते सहकार भारती संघटनेमध्ये सामान्य कार्यकर्त्याप्रमाणे वावरतात. मोठेपणाचा कुठला लवलेश सुद्धा त्यांना कधीच शिवून जात नाही. सतत कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहणं, त्यांच्या भेटी घेणं, त्यांच्या घरी निवासाला जाणं आणि त्या कार्यकर्त्याला यथोचित मार्गदर्शन करणं हा त्यांचा नित्यक्रम अखंडपणे सुरू आहे. संघटनेला असं नेतृत्व लाभल्यामुळे आज माझ्यासारखे हजारो कार्यकर्ते संघटनेमध्ये झोकून काम करीत आहेत. ''संघटना सर्वतोपरी'' हा मंत्र त्यांनी कार्यकर्त्यांना दिला आणि त्यामुळेच आज संघटनेची ताकद दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सतीशजींनी आज ७५ व्या अमृत म होत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. आपण सर्व कार्यकर्ते त्यांची शताब्दी साजरी करू एवढे दीर्घायुष्य परमेश्वर त्यांना देवो. त्याचप्रमाणे त्यांचं प्रेम, स्नेह अखंडपणे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना नेहमीच मिळत राहो अशी ईश्वरचरणी प्रार्थना व त्यांच्या निरोगी व दीर्घायुष्य करता ईश्वरचरणी मनोकामना..

विवेक दिनकर जुगादे
महामंत्री
सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश



# परिपूर्ण मार्गदर्शक

**मासिके, पुस्तके आणि ज्ञान देणाऱ्या सर्वच प्रकारांमध्ये मराठे साहेब जास्त रमतात. त्यांना याविषयी अधिक ओलावा आहे. अचूक आणि सर्वसमावेशक माहिती असल्याशिवाय सहकार क्षेत्रात काम करता येणार नाही, यावर ते अधिक भर देतात.**



**भालचंद्र कुलकर्णी**

आदरणीय सतीशजींचा अमृत महोत्सव साजरा करतांना खूप आनंद वाटतो आहे. आपल्या घरातल्याच एका ज्येष्ठ व्यक्तीचा वाढदिवस होतोय अशीच भावना आहे. माझी सतीश मराठे साहेबांची पहिल्यांदा प्रत्यक्ष भेटकधी झाली हे आठवणं अवघड आहे. बहुतेक जनकल्याण बँकेत मराठे साहेब असतांना आणि मी पुण्याच्या जनसेवा सहकारी बँकेत नोकरीस होतो, तेंव्हा म्हणजे साधारणपणे १९९७ मध्ये एका कार्यक्रमात भेट झाल्याचे आठवते. त्यावेळचे सहकार भारतीचे संघटनमंत्री स्व. तात्या इनामदार यांच्यामुळे मी सहकार भारतीत ओढला गेलो. आदरणीय वसंतराव देवधर आणि स्व. विजयराव कुलकर्णी यांच्या बरोबर काम करतांना कायम मराठेसाहेबांचा उल्लेख होत असे. सहकार भारतीच्या कामात काही अडचण आली तर तात्या देखील बोलतांना, अरे गड्या, हे तु सतीशला विचारुन घे, असेच कायम सांगत असत. नंतरच्या काळात आमच्याकडे म्हणजे पुणे जनसेवा बँकेत प्रेमचंद मेहतासाहेब रुजू झाले. मराठे साहेब आणि मेहता साहेब दोघेही जनकल्याण बँकेचे, त्यामुळे स्वाभाविकच अनेकदा मराठे साहेबांची आठवण निघत असे, वारंवार भेटी देखील होत होत्या.

सहकार भारतीच्या कामात वेगवेगळ्या भेटींमध्ये मराठे साहेब अधिक उलगडत गेले. योग्य तेच करावे, कोणत्याही कामाचे अधिक सुक्ष्म नियोजन करावे, त्यातून सहकार भारतीला नेमका काय उपयोग होणार आहे, याचा कायम विचार करणारा माणूस म्हणजे मराठे साहेब. मूळातली त्यांची अभ्यासू वृत्ती आणि संशोधनात्मक नजर. त्यामुळेच त्यांचा नेहमी सांख्यिकीय माहितीवर (डेटा) आणि त्याच्या विश्लेषणावर अधिक भर असतो. अशा माहितीमुळे आपल्याला नेमकी स्थिती कळते आणि त्यावर अधिक विचार मंथन करुन उपाय शोधता येतो, ही त्यांची काम करण्याची पध्दत आहे. सर्वजण जे करतात, ते न करता काहीतरी वेगळे करण्याचा प्रयत्न करावा, अशीही मराठे साहेब कायम सूचना करत असतात.

सहकार सुगंध मासिकासाठी मराठे साहेब कायमच इनपुटस् देत असतात. सहकार चळवळीत कोणताही कार्यक्रम असो, त्याची माहिती मराठे साहेब न चूकता मला पाठवतात. एवढेच नाही तर, यात महत्वाचे काय आहे, यांच्याशी तू बोलून घे, यांची मुलाखत घे, यांना लिहायला सांग अशा असंख्य गोष्टी मराठेसाहेब अगदी दररोज सांगत असतात. एखाद्याला आपलेसे करायचे तर त्याच्याशी वैयक्तिक आणि जिव्हाळ्याचे संबंध असायला हवेत, जे मराठे साहेब जपतांना दिसतात. माझ्याशी असो किंवा माझ्या पत्नीशी (सौ. माधुरी) त्यांचा संवाद सातत्याने होत असतो.






मी किंवा माधुरी आजारी असलो की रोज न चूकता चौकशी करुन दिलासा देतात. घरातल्या वडीलकीच्या नात्याने प्रेमाचा सल्लाही देतात. प्रेमाबरोबरच त्यांचा आमच्यावर तेवढा अधिकार देखील आहे. अधिकाराने काही वेळा कामही सांगतात, जे सहज असते, सहज होऊनही जाते.

सहकार भारतीच्या प्रवासाची असो किंवा त्यांची वैयक्तिक प्रवासाची योजना असो, मराठे साहेब मला सहज माहिती देऊन ठेवतात, सांगून ठेवतात. जमलं तर एखाद्या ठिकाणी सोबत येण्याचा आग्रहही धरतात. त्यांच्याबरोबरचा प्रवास असो किंवा गाठीभेटी असोत, त्यांचा सहज मिसळून जाणारा स्वभाव सर्वांनाच भावतो. पुण्यात येणार असले की हमखास भेट कशी होईल, यासाठी त्यांची पूर्वसूचना असते, नियोजन असते.

सहकार भारतीचे संस्थापक अध्यक्ष स्व. अण्णासाहेब गोडबोले यांच्या जीवनावरचा आधारवड ग्रंथ प्रसिध्द केला तेंव्हापासून ते अलिकडे सहकार महर्षी ग्रंथ प्रकाशित केला इथपर्यंत नेहमीच मराठे साहेबांनी उत्तम मार्गदर्शन केले. सहकार भारतीची वेबसाईट कशी असावी, यासाठी त्यांनी मला विशेष मार्गदर्शन केले. सहकार सुगंध हिंदी आणि इंग्रजीतून देखील निघावा यासाठी त्यांनीच आग्रह धरला. मासिके, पुस्तके आणि ज्ञान देणाऱ्या सर्वच प्रकारांमध्ये मराठे साहेब जास्त रमतात. त्यांना याविषयी अधिक ओलावा आहे. अचूक आणि सर्वसमावेशक माहिती असल्याशिवाय सहकार क्षेत्रात काम करता येणार नाही, यावर ते अधिक भर देतात. कोणत्याही कामात परिपूर्णता असावी असा विचार देणाऱ्या सतीशजींना अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा ! सहकार, संघटन आणि समर्पण अशी त्रिसूत्री आपल्या जीवनामध्ये अंगिकारणाऱ्या मराठे साहेबांना दिर्घायु आरोग्य लाभावे आणि त्यांची सोबत अशीच सदैव लाभावी हीच इच्छा !





# एक अजातशत्रू व्यक्तीमत्त्व

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक, बँकिंग क्षेत्रातील जाणकार तज्ज्ञ, विविध आर्थिक तसेच सामाजिक क्षेत्रातील संस्थात सहभागी होणारे कायम हसतमुख असणारे व प्रेरणा देणारे तसेच केलेल्या कामाबद्दल शाबासकी देणारे, असे 'अजातशत्रू' व्यक्तीमत्त्व.**



शिरीष गोडबोले

सतीशजी मराठे यांचा माझा परिचय साधारण १९९५-९६ मधील जनकल्याण पतसंस्था कराडमध्ये सुरू केल्यावर जमा झालेल्या ठेवींच्या योग्य गुंतवणुकीबाबत व एकंदरीतच संस्थेच्या आर्थिक कामकाजाबाबत सल्ला घेण्यासाठी आम्ही जनकल्याण बँक मुंबई येथे जात होतो. चेंबुरला बँकेचे मुख्य कार्यालय होते. त्यामुळे आम्ही पहाटे निघून ११ वाजेपर्यंत चेंबुरला पोहोचायचो. सतीशराव बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर होते. त्यामुळे त्यांची भेट घेवूनच कामाला सुरुवात करत असू. मराठेसाहेब आमचे स्वागत ज्या आपुलकीने व जिव्हाळ्याने करत त्यामुळे प्रवासाचा शीण न वाटता आम्हाला काम करायला उमेद यायची.

पतसंस्था नवीन असल्याने आम्ही त्यांचा सल्ला घेवूनच कोणताही उपक्रम हाती घ्यायचो. मराठे साहेबांना भेटायला येणाऱ्यांमध्ये समाजाच्या सर्व स्तरांतील लोक यायचे. सर्वांनाच भेटून आपले काम करून घेण्याची गडबड असायची. पण आम्हाला काम करून परत कराडला जायचे आहे. याची जाणीव ठेवून ते आपल्या सर्व सहकाऱ्यांना सूचना देत असत. सहकारात काम करत असताना काय करावे व काय करू नये याबाबत मोलाचा सल्ला देत पतसंस्थेच्या जडणघडणीत साहेबांचादेखील मोठा वाटा आहे.

मराठे साहेब साताऱ्याला युनायटेड वेस्टर्न बँकेचे चेअरमन म्हणून त्यांनी सुत्रे हाती घेतली. त्यांचे स्वागत करण्यासाठी बँकेत त्यांना भेटावयास गेलो. आश्चर्य म्हणजे साहेबच आमचे स्वागतासाठी केबिनमधून बाहेर आले. आम्हालाच लाज वाटली की एवढा मोठा माणूस असे करू शकतो.

सतीशजी मराठे यांचे सहकार क्षेत्रातील काम तर सर्वांना अवगत आहेच. पणत्यांचा अफाट लोकसंग्रह संपूर्ण देभर पसरलेला आहे. एकदा ओळख झालेला माणसाची कायम या ना त्या कारणाने संपर्कात राहण्याची त्यांची हातोटी विशेष आहे.

आम्ही सहकार भारतीच्या कामासाठी एक दिवस रात्री बैठकीसाठी सातारला गेलो होतो. तत्पूर्वी साहेबांच्या 'आपुलकी' या निवासस्थानी जाण्याचा योग आला. बैठकीला थोडा वेळ होता. साहेब म्हणाले आपण चहा घेवू व मग बैठकीकडे जावू. आमची समजूत झाली की साहेब बँकेचे अध्यक्ष आहेत म्हणून अन्य कोणीतरी चहा करून आणेल. पण पाहतो तर काय साहेबांनी स्वत:च चहा करून आणला होता. यामध्ये गमतीची गोष्ट अशी की आमच्यातील एका सहकाऱ्याने आजपर्यंत कधीही चहा घेतला नव्हता. साहेबांनी चहा केला हे कळल्यावर त्याने काहीही हिचकिच न करता चहा घेतला. त्याची प्रतिक्रिया अशी होती की, बँकेचे अध्यक्ष जर





आपल्यासाठी चहा करतात तर किमान त्यांचा मान ठेवायचा म्हणून तरी मला चहा घेतलाच पाहिजे.

संस्थेच्या मार्गक्रमणेत मा. मराठे साहेबांचे मार्गदर्शन व सल्ला वेळोवेळी मिळत आहे. पतसंस्थेच्या सदरबझार शाखेच्या उद्‌घाटन मा. मराठेसाहेब व दिग्दर्शन क्षेत्रातील एक अग्रेसर कलाकार के विनय आपटे हे दोघे आले होते.

कोणत्याही विषयावर मत व्यक्त करण्यापूर्वी त्या परिस्थितीचा तौलानिक अभ्यास करणे ही त्यांची विशेषता आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक, बँकिंग क्षेत्रातील जाणकार तज्ज्ञ, विविध आर्थिक तसेच सामाजिक क्षेत्रातील संस्थात सहभागी होणारे कायम हसतमुख असणारे व प्रेरणा देणारे तसेच केलेल्या कामाबद्दल शाबासकी देणारे, असे 'अजातशत्रू' व्यक्तीमत्त्व.

मा. सतीश मराठे साहेबांना माझ्या व्यक्तीगत व जनकल्याण पतसंस्थेच्या वतीने अमृत महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा.

साहेबांच्या या अमृतमहोत्सवी प्रवासात त्यांच्या घरच्यांनी दिलेली साथ देखील तेवढीच महत्त्वाची आहे. त्यांनाही हार्दिक शुभेच्छा.

आपला स्नेहांकित<br>
शिरीष गोडबोले<br>
अध्यक्ष, संचालक - जनकल्याण पतसंस्था, कराड

---

# भारत के प्रथम सहकारिता एटीएम का शुभारम्भ

लेखक शेखर किबे

बात २३ मार्च २०१२ के गुडी पडवा के अवसर की है. २०१२ में सम्पन्न इन्दुर परस्पर सहकारी बैंक लिमिटेड के संचालक मंडल चुनाव में भारी सफलता के साथ बैंक का संचालक मंडल काबिज हुआ. बैंक का अध्यक्ष के रूप में डॉ अनिल कुटुम्बले व मानसेवी सचिव के रूप में लगातार तीसरे कार्यकाल के रूप में मुझे चुना गया.




गुडी पडवा को बैंक का स्थापना दिवस मनाया जाता व इस पावन अवसर पर गुढी पूजन किया जाता है एवं दिवस पर बैंक के सभी सदस्यों, खातेदारों को एक नई सेवा देने का बीड़ा उठाया गया. उक्त कार्यक्रम के पूर्व बैंक में गुरूजी यो द्वारा माँ सरस्वती पूजन, मंत्र जागरण का कार्यक्रम किया जाता है. उसके पश्चात उस वर्ष भारत में पहली बार एटीएम ट्रांसेक्शन की सुविधा किसी सहकारी बैंक द्वारा अपने खातेदारों को दी गई.

इस अवसर पर बैंक के तत्कालीन अध्यक्ष डा अनिल कुटुम्बले द्वारा बैंक के ग्राहकों को इस सुबिधा के लिए बधाई दी गई. उक्त सेवा देने हेतु बैंक के वरिष्ट मार्गदर्शक एवं तत्कालीन सहकार भारती के अध्यक्ष श्री सतीश मराठे को आमंत्रित किया गया. उन्होंने बैंक के संचालक मंडल को इस नई सुविधा देने हेतु आभार व्यक्त कीया तथा बैंक के ग्राहकों को भी अपनी ओर से धन्यवाद किया क्योंकि आज से १५ वर्ष पूर्व इस प्रकार की सुविधा प्राप्त करना एक उत्कृष्ट उदारहण है. उक्त अवसर पर सर्वत्र टेक्नोलॉजी के अधिकारी भी उपस्थित थे।



# सहकारातील दुरदुष्टी असणारे नेतृत्व

**संस्थेमार्फत कार्यकारी संचालक मंडळ, कर्मचारी व दैनंदीन ठेव प्रतिनिधी यांचेमध्ये सुसंवाद साधला जावा, कर्मचा-यांना बैंकिंग क्षेत्रात झालेले बदल माहिती व्हावेत तसेच त्यांची कार्यक्षता वाढावी याकरीता प्रतिवर्षी अधिवेशनाचे आयोजन करण्यात येते. या अधिवेशनामध्ये मा. श्री. सतीश मराठे साो. यांनी उपस्थितीत राहुन आम्हाला बहुमुल्य मार्गदर्शन करतात.**



जिजाबा पवार

''एकमेका सहाय्य करु, अवघे धरू सुपंथ'' या संत तुकाराम महाराजांच्या सुंदर वचनाप्रमाणे परस्परांना सहाय्य करुन स्वतः बरोबर इतरांचेही हित साधणे महणजेच ''सहकार'' आहे.

सहकारातील दुरदुष्टी असणारे नेतृत्व म्हणजे आदरणीय सतीश म राठे ! त्यांचे नाव सहकारामध्ये परिचित आले ते ''सहकार भारती'' या संस्थेमुळे, ते या संस्थेचे संस्थापक सदस्य आहेत. या संस्थेची स्थापना १९७९ मध्ये आली. ते सध्या या संस्थेचे राष्ट्रीय कार्यकारी परिषद सदस्य आहेत. सहकाराला गतवैभव मिळावे या करीता विविध माध्यम ातुन पाठपुरावा करणारे व सहकार चळवळीत स्वतःला झोकुन देणारे असे व्यक्तीमत्व आहे. गेल्या काही वर्षांमध्ये, सहकार भारतीने आपल्या उपक्रमांचा देशभरात प्रसार केला आहे आणि सध्या ५०० जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या ३५.००० हून अधिक सहकारी संस्था सहकार भारतीच्या उपक्रमांशी आणि कार्यक्रमांशी संबंधित आहेत. आज सहकार भारती हि देशातील सहकार क्षेत्रातील सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था म्हणून उदयास आली आहे.

त्यांनी बैंक ऑफ इंडियामध्ये आपल्या बैंकिंग कारकीर्दीची सुरुवात केली. जनकल्याण सहकारी बँकेत त्यानी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन काम करताना प्रति कर्मचारी व्यवसाय चौपटीने वाढयला व बैंकने देशातील सहकारी बैंकाच्या यादीत पहिल्या १० मध्ये स्थान पटकविले व बैंकर्स बेस्ट बैंक ॲवॉर्ड मिळाले अशी अनेक उल्लेखनीय कामे त्यांनी केली. युनायटेड वेस्टर्न बैंक लि मध्ये ते अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (२००२ ते २००६ पर्यंत) होते. या बँकेचे मुख्य कार्यालय सातारा या ठिकाणी होते व या बँकेचा त्या भागात नावलैकीक होता.

आमच्या ज्ञानदीप को-ऑप क्रेडिट सोसायटी ची स्थापना सन १९७८ साली मुंबई येथे आली. मात्र बहुतांशी सभासद सातारा व सांगली भागातील व संस्थेचे संचालक सदस्य सातारा जिल्यातील असल्याने संस्थेने सातारा जिल्ह्यात कार्यविस्तार केला. त्यादरम्यान आम्हाला मराठे सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. आमच्या संस्थेमार्फत कार्यकारी संचालक मंडळ, कर्मचारी व दैनंदीन ठेव प्रतिनिधी यांचेमध्ये सुसंवाद साधला जावा, कर्मचा-यांना बैंकिंग क्षेत्रात झालेले बदल माहिती व्हावेत तसेच त्यांची कार्यक्षता वाढावी याकरीता प्रतिवर्षी अधिवेशनाचे आयोजन करण्यात येते. या अधिवेशनामध्ये मा. श्री. सतीश मराठे साो. यांनी उपस्थितीत राहुन आम्हाला बहुमुल्य मार्गदर्शन केले. आमच्या

संस्थेने आज ६४०० कोटी संमिश्र व्यवयाचा टप्पा पुर्ण केला आहे यामध्ये मा. मराठे सो याच्या मार्गदर्शनाचा वेळोवेळी उपयोग आला. भविष्यातही आमच्या सारख्या संस्थांना सरांच्या मार्गदर्शनाने समृध्द अनुभवाचा फायदा होईल असा विश्वास आहे.

मा. श्री सतीश मराठे सो हे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय मटळावर संचालक, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे सचालक, सरकारने सदस्य आहेत. अनेक संस्थांमध्ये ते कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते अर्थमंत्र्यासोबतच्या अर्थसंकल्पपूर्व बैठकांमध्ये सहकार क्षेत्राचे प्रतिनिधित्व करत आहेत. २०१५ मध्ये IFFCO ने त्यांना सहकारिता रत्न पुरस्कार प्रदान केला महाराष्ट्रातून ते एकमेव पुरस्कार प्राप्तकर्ते आहेत.

सहद्यस्थितीत माः श्री मराठे साो

१) संचालक, सेंट्रल बोर्ड ऑफ रिझर्व्ह बैंक ऑफ इंडिया

२) संचालक, राष्ट्रीय गृहनिर्माण बैंक

३) आयसीएआयच्या इंडियन इन्सिट्यूट ऑफ इन्सॉलव्हन्सी प्रोफेशल्सचे स्वतंत्र संचालक

४) राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीसीटी) कार्यकारी समितीचे सदस्य

५) लक्ष्मणराव इनामदार राष्ट्रीय सहकारी संशोधन आणि विकास अकादमी (LINAC) चे उपाध्यक्ष

६) पालघर जिल्हयातील जव्हार येथील मुकबधिर आदिवासी मुलांसाठी असलेल्या प्रगती प्रतिष्ठानच्या निवासी शाळेचे विश्यस्त

७) कार्याध्यक्ष, सिदार्थ विदयालय, कल्याण

८) त्रिस्तरीय अल्पकालीन सहकारी पत संरचना (STPS) ची प्रासगिकता, लागूता व धारणा यावर

अभ्यास करण्यासाठी भारत सरकारच्या नियुक्त तज्ञ समितीचे सदस्य अशा महत्वाच्या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा ।

दि १ फेब्रुवारी १९५० रोजी जन्मलेले श्री सतीश मराठे सर आज अमृत महोत्सवात पर्दापण करीत आहेत राष्ट्रच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देण्यासाठी त्यांना ज्ञानदीप परिवारांकडुन हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

**जिजाबा पवार**
अध्यक्ष
ज्ञानदीप को ऑप क्रेडिट सोसायटी



# मुर्ती लहान पण किर्ती महान

**जनकल्याण बँकेत येण्यापूर्वी बँक ऑफ इंडिया, डोंबिवली नागरी सहकारी बँक, जनकल्याण बँक, युनायटेड वेस्टर्न बँक व आज रोजी भारतीय रिझर्व बँक संचालक असा त्यांचा प्रवास. हा त्यांच्या कार्याचा गौरव शाली व प्रगती चा सर्वांना आदर्शवत आहे.**



**संतोष जगन्नाथ सुर्वे**

सहकार भारती संस्था मंडळाचे सदस्य श्री सतीश मराठे यांना १ फेब्रुवारी २०२५ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली. सहकार भारती तर्फे श्री सतीश मराठे यांचे अमृत महोत्सवाचा कार्यक्रम १९ फेब्रुवारी २०२५,रोजी आयोजित करण्यात येत आहे.

''मूर्ती लहान पण कीर्ती महान'' हे संबोधन लालबहादूर शास्त्री यांना त्यांच्या कार्याविषयी संबोधित केले जायचे, असेच काहीसे श्री सतीश मराठे यांज विषयी आपणास म्हणता येईल. श्री सतीशजी शी जनकल्याण सहकारी बँकेत १९९१ला बँकेचे जनरल मॅनेजर म्हणून रूजू झाले. मि त्यावेळी प्रशासकीय विभागात काम करत होतो. चेंबूर येथील मुख्य कार्यालयात त्यांची जनरल मॅनेजर म्हणून नियुक्ती झाल्यावर संपर्क झाला. त्यांच्या नियुक्तीनंतर त्यांना हव्या असलेल्या दैनंदिन कामासाठी उपयोगी पडणाऱ्या वस्तूंची यांदीची पूर्तता करताना त्यांची प्रत्यक्ष प्रथम भेट झाली. परिचयात संघ स्वयंसेवक असल्याने एक वेगळी जाणीव झाली. हळूहळू त्यांच्या स्वभावाचा, कार्य शैलीचा अनुभव मिळायला लागला. विचारांची दूरदृष्टी ही जाणवायला लागली. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे व त्याचा उपयोग कार्यालयीन कामात करून घेणे हि कार्यशैली, याचे एक उत्तम उदाहरण आपणांसमोर कथित करतो. त्या काळात बँकेच्या काही कायदेशीर पत्रव्यवहार करावा लागत असे, बँकेचे कायदेशीर सल्लागार यांचे कार्यालय मुंबई सेंट्रल या ठिकाणी होते, तर बँकेचे मुख्य कार्यालय हे चेंबूर येथे होते. अशावेळी काही पत्रव्यवहाराच्यासाठीचा मजकूर हा मंजूर करण्यासाठी मुंबई सेंट्रल या ठिकाणी जावे लागत होते. व त्यात काही आवश्यक बदल हवा असेल तर तो बदल करण्यासाठी चेंबूर - मुंबई सेंट्रल हा प्रवास करून तो सुधारित करणे हे काम करावे लागत होते. या कामात भरपूर जाण्या येण्यासाठी वेळ जात असे. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, म्हणजे चेंबूरला तयार केलेले पत्र योग्य त्या व त्यातील बदल हा त्यावेळी फॅक्समधील मशीन द्वारे पूर्ण करणे याचा वापर श्री सतीशजींनी शिकवले. लागलीच फॅक्स मशीन बँकेच्या कार्यालयासाठी विकत घेतले. तसेच अधिकारी वर्गाला संदेश देण्यासाठी पेजर विकत घेऊन दिले.मोबाईल त्याचा वापर करणे यासारख्या नवीन गोष्टी वापरात आणल्या गेल्या.

त्याकाळी त्यांचा सहकार भारती मधील असलेल्या कार्याचा जवळुन, वेळोवेळी अनुभव मिळाला. लाईक माइंडेड बँक आपल्या समविचारांच्या बँकांना एकत्र आणून व त्यातून अपेक्स बँकेची स्थापना करणे. यासाठी मुंबई, ठाणे, वसई व पुणे या क्षेत्रातील सहकारी बँकांच्या बैठका घेणे



त्यांना एकत्र आणणे याची जबाबदारी काही अंशी माझ्यावर सोपवली (व्यवस्थात्मक दृष्टीने) जात असे. या विविध बँकांचे अध्यक्ष कार्यकारी अधिकारी ही सर्व मंडळी एकत्र आणणे, त्यांच्याशी पत्रव्यवहार करणे हे काम त्यांचे सातत्याने चालत असे. अशा कार्यक्रमात ते आवर्जून काही जबाबदारीचे काम सोपवीत असत. बँकेत त्यावेळी असलेले दिग्गज संचालक उदा. कै. वेदप्रकाश गोयल, वसंतराव पटवर्धन, चंद्रकांत जगताप व श्री विजय गिरकर अशा अनेक संचालकांसोबत काम करण्याचा अनुभव मिळाला. बँकेच्या ८ शाखेवरून २५ शाखांचा विस्तार होताना विविध जबाबदाऱ्या पार पडताना सरकारी परवानगी मिळविणे नवीन जागा शोधणे बँकेच्या नवीन शाखांचा उद्घाटन समारंभाची जबाबदारी, त्याला आवश्यक अशा नवीन क्षेत्रात संघ स्वयंसेवक संघ अधिकारी, बँकेचे खातेदार यांच्या संयुक्त बैठका घेणे, इत्यादी कामकाज करताना सतत ते पाठीशी असत. बँकेच्या वसुली विभागात काम करतानाही जप्ती कामकाजात त्यांचा पाठिंबा मिळत असे. इडर - गुजरात येथील जप्तीसाठी जावे लागले, तेव्हा त्यांच्या सहकार भारतीच्या संपर्कामुळे आमची व्यवस्था व कलेक्टर भेटी अगदी सुलभ रीतीने पार पाडल्या. बँकेच्या कर्मचाऱ्यांची ओळख व त्यांची कुवत या गोष्टींचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. यामुळे कर्मचारी मंडळींकडून काम करून घेणे ही त्यांची कुशलता होती. जनकल्याण बँकेत प्रथमता जनरल मॅनेजर म्हणून रुजू झाले. मुख्य कार्यकारी अधिकारी असताना बँकेची प्रगती ही अन्य सहकारी बँकांशी स्पर्धात्मक असे. जनकल्याण बँकेची ही प्रगती वाखाणण्यासारखी होती. जनकल्याण बँकेत येण्यापूर्वी बँक ऑफ इंडिया, डोंबिवली नागरी सहकारी बँक, जनकल्याण बँक, युनायटेड वेस्टर्न बँक व आज रोजी भारतीय रिझर्व बँक संचालक असा त्यांचा प्रवास. हा त्यांच्या कार्याचा गौरव शाली व प्रगती चा सर्वांना आदर्शवत आहे. सामाजिक क्षेत्रातील तसेच राजकीय क्षेत्रातील वरिष्ठ मंडळींशी वैयक्तिक परिचयामुळे काही गोष्टी मला स्वतःला अनुभवता आल्या.

जनकल्याण बँकेत ते असेपर्यंत त्यांच्या कुटुंबाशी विशेषता त्यांच्या अर्धांगिनीची सौ भारती वहिनींची व त्यांच्या दोन्ही मुलांशी संपर्क झाला. तसेच त्यांचा माझ्या कुटुंबांशीही संबंध आला व एक जवळीक साधली गेली. त्यांचा हा एक स्वभाव गुण वाखाणण्यासारखा असून मोठ्या पदावर असून सुद्धा एखाद्या कुटुंबाशी संपर्क व आपलेपणा ठेवणे हा आदर्श आहे. बालपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता व नंतर सागरी सीमा मंच प्रांतस्तरावरची जबाबदारी व आज रोजी प्रांताने दिलेल्या सहकार क्षेत्रातील जबाबदारीमुळे सहकार भारतीशी संबंध आला. जनकल्याण बँकेनंतर सहकार भारतीची जबाबदारी आल्याने सतीशजींशी पुन्हा एकदा काम करण्याची सुलभ संधी प्राप्त झाली त्यांच्या या ७५ व्या रोप महोत्सव कार्यक्रमास हार्दिक शुभेच्छा. त्यांच्या या सहकार क्षेत्रातील सेवा कार्याचे मार्गदर्शन सदैव मिळत राहो ईश्वरचरणी प्रार्थना त्याचबरोबर त्यांना निरोगी आयुष्य लाभो ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

**संतोष जगन्नाथ सुर्वे**
संघटन प्रमुख मुंबई विभाग



# A man of Cooperative vision

**Shri Marathe's personality is a reflection of his core values—unassuming, selfless, and steadfast in his principles. His soft-spoken nature and tireless work ethic have earned him admiration from colleagues and workers alike. His personal relationships, grounded in humility and sincerity, have endeared him to not only the members of Sahakar Bharati but also to all who come in contact with him.**



CA Abhay Mate

A Tribute to Shri Satish ji Marathe:

A Lifetime of Dedication to the Cooperative Movement on His 75th Birthday. Shri Satish Marathe is a name synonymous with the unwavering commitment to the cooperative movement in India. For more than five decades, he has dedicated his life to the advancement of this cause, making his 75th birthday a momentous occasion for all who work in the cooperative sector. In celebration of this remarkable milestone, Sahakar Bharati will be honoring Shri Marathe with an Amrit Mahotsav at the Swami Narayan Mandir in Dadar on February 19, 2025, at 11 a.m.

Born on February 1, 1950, Shri Satish Marathe graduated in Commerce and Law from the University of Bombay and was conferred with a Gold Medal for his Diploma in Journalism from Bharatiya Vidya Bhavan.

Shri Marathe began his banking career with Bank of India and later rose to prominence as the CEO of Janakalyan Sahakari Bank Ltd. His exceptional leadership led him to become the Chairman and CEO of The United Western Bank Ltd., where he steered the institutions towards sustained growth. His extensive experience has also led him to serve as a Director on the Reserve Bank of India board for two consecutive terms. Strongly associated with RSS, he served as National Treasurer of Akhil Bharatiya Vidyarthi Parishad. He was detained under the draconian MISA for participating second freedom fighting movement, emergency era, under the leadership of Jay Prakash Narayan in 1975.

A founding member of Sahakar Bharati, Shri Marathe has played a pivotal role in expanding its influence nationwide. The organization's guiding principle, ''विना संस्कार नही सहकार, विना सहकार नही उद्धार'' —meaning "No cooperation without values, and no upliftment without cooperation"—reflects his core belief that cooperation must be rooted in ethical values. His leadership journey with Sahakar Bharati saw him serve as Maharashtra General Secretary, National General Secretary, National President, and Patron. Under his stewardship, Sahakar Bharati has become the largest NGO in the cooperative sector, engaging with over 40,000 cooperatives across India. The organization has been instrumental in economically empowering individuals and fostering social inclusion through the cooperative model.



A man of vision, Shri Marathe also established the Centre for Studies and Research in Cooperation (CSRC) to promote research and education in the cooperative sector. His expertise has been invaluable at the national level, where he served as a member of the National Committee for drafting the New National Cooperative Policy under the Ministry of Cooperation, Government of India. His analytical prowess and swift decision-making abilities have also led him to hold prominent roles, including Director at the National Housing Bank, Independent Director at the Indian Institute of Insolvency Professionals of ICAI, Member, Expert Committee, Study on Relevance, Applicability and Retention of Three-Tier Short Term Cooperative Credit Structure (STCS), Ministry of Cooperation, GOI and Member of the Expert Committee on the Short-Term Cooperative Credit Structure under the Ministry of Cooperation, Government of India. He is championing cause of empowering PACs & Primary Milk Societies and relentlessly pursuing cause of re-writing State and Central enactments. Shri Marathe's contributions extend to various other key position such as Hon. Secretary of the Indian Banks' Association, Vice President of the Private Sector Banks' Association, Director at the National Cooperative Development Corporation, and Member of several government committees, including the High Power Committee for Weak UCBs and the Maharashtra State Cooperative Council.

In addition to his exceptional work in the cooperative sector, Shri Marathe has made substantial contributions to education and social welfare. He served as the President of Pragati Pratishthan for 15 years and currently serves as Trustee, running a residential school dedicated to the education and care of tribal children who are dumb and mute, located in Jawhar, District Palghar. His commitment to social service extends to his role as the Working President of Siddharth Vidyalaya, a prominent educational institution in Kalyan, which focuses on holistic development and quality education for underprivileged children. In 2015, IFFCO recognized his exceptional service to the cooperative sector by awarding him the Sahakarita Ratna Award. For several years, he has been a representative of the cooperative sector in Pre-Budget consultations with the Finance Ministers of India.

Shri Marathe's personality is a reflection of his core values—unassuming, selfless, and steadfast in his principles. His soft-spoken nature and tireless work ethic have earned him admiration from colleagues and workers alike. His personal relationships, grounded in humility and sincerity, have endeared him to not only the members of Sahakar Bharati but also to all who come in contact with him. On the auspicious occasion of Shri Satish Marathe's Amrit Mahotsav, we offer our deepest respect and heartfelt wishes for his continued health and longevity. His invaluable contributions to the cooperative movement have shaped its very foundation, and we pray that his wisdom continues to inspire future generations.

**- CA Abhay Mate, Pune**
Mobile 98223 51901



# बहुआयामी मित्र

**सतीश जसा हुशार होता तसा तो खूप अभ्यास होता त्याचे खूप वाचन होते. त्याला लेखन करण्याची आवड पण होती. त्याचं मराठी आणि इंग्रजीवर प्रभुत्व होते. त्यामुळे तो आपोआपच विद्यार्थी परीक्षेच्या थिंकटंक सभासद झाला.**



सुरेंद्र धारप

सतीशचा आणि माझा ६६ - ६७ पासून माझा माझा परिचय आहे मी ६३ - ६४ पासून विद्यार्थी परिषदेचे काम करत होतो त्यामुळे माझे मुंबईला जाणे येणे होते एकदा मी मुंबईला गेलो असताना गणेश भेट झाली तो तिथे विद्यार्थी परिषदेचा पूर्ण वेळ कार्यकर्ता होता त्यांनी मला सतीश या घरी नेले ओळख करून देण्यासाठी घरी नेलेत्याची आई फारच शांत स्वभावाची आणि आणि प्रेमळ स्वभावाची होती प्रेमाने तिनी माझी पण चौकशी केली आणि आता आठवत नाही काहीतरी आम्हाला खायला दिले. त्यानंतर माझा आणि सतीश चा संपर्क खूप वाढला आमची मैत्री झाली सतीश हुशार स्मार्ट दिसणारा मृदू बोलणारा असा सर्वांना प्रेमाचा वाटणारा असा कार्यकर्तवला तिच्या अनेक गुण हळूहळू माझ्या लक्षात येत होते सर्व कार्यकर्त्यांशी मिसळत असे सर्वांची चौकशी करत असे आपलेपणाने सर्वांशी बोलत असे मिळण्या प्रकारची त्यांना मदत करत असे आणि त्याच्या त्यामुळे त्याचा मित्र परिवार कार्यकर्त्यांचा परिवार खूप वाढला होता सतीश जसा हुशार होता तसा तो खूप अभ्यास होता त्याचे खूप वाचन होते. त्याला लेखन करण्याची आवड पण होती. त्याचं मराठी आणि इंग्रजीवर प्रभुत्व होते. त्यामुळे तो आपोआपच विद्यार्थी परीक्षेच्या थिंकटंक सभासद झाला. यामध्ये यशवंतराव केळकर बाळासाहेब आपटे मदनदासवगैरे प्रमुख कार्यकर्ते होते निळ्या बैठकींचे प्लॅनिंग करणे त्याच्यात जे कार्यक्रम होणार आहेत त्यासंबंधीचे प्रारूप तयार करणे विषयाची मांडणी करणं आणि पेपर पॉलिसी पेपर्स तयार करणे असं तो काम





आवडीने करत असे प्रथम तो बँक ऑफ इंडिया मध्ये कामाला होता काही वर्ष किंवा बरेच वर्षे तो त्या बँकेत होता त्यानंतर तो डोंबिवली नागरी बँकेत नागरी सहकारी बँकेत गेला आणि थोडेच एक दोन वर्षातच तो जनकल्याण सहकारी बँकेचा मॅनेजमेंट झाला या तिन्ही बँकेमध्ये मी त्याच्याकडे सातत्याने जात असे गप्पागोष्टी चर्चा आणि काही बदल आणि काही अडचणी बद्दल मदत घेत असे इमर्जन्सी मध्ये तो नाशिकच्या जेलमध्ये १९ मध्ये होता त्यावेळेला मी आणि गणेश दुबई बाहेरून काम करत होतो इमर्जन्सी झाल्यावर सतीश ने सहकार भारतीचे काम यशवंतराव केळकर बाळासाहेब आपटे आणि मदन दाजी मदन दाजींच्या सांगण्यावरून काम सुरू केले काम सुरू केले त्यावेळेला सहकार भारती ही फार छोटी संस्था होती त्यामध्ये त्यांनी झोकून देऊन काम केले देशभर प्रवास केला कार्यकर्त्यांच्या भेटी निर्णया सरकारी अधिकाऱ्यांच्या भेटी बँकांच्या भेटी तू घेत असे अधिवेशन छोटे छोटे मोठे कार्यक्रम अनेक संस्थांना भेटी देणे त्यांचे प्रश्न समजून घेणे त्यांना मार्गदर्शन करणे अशा अनेक गोष्टी अनेक करत असे त्याचा अभ्यास चांगला असल्यामुळे सर्व कार्यकर्त्यांना त्याचा फार उपयोग होत असे. या सर्व काळात सुद्धा मी त्याला कधी चिडलेला त्रासलेला पाहिलेला नाही तो सहकार भारती मध्ये प्रमुख कार्यकर्ता झाल्यामुळे संघाच्या अखिल भारतीय समन्वय समितीमध्ये येत असेल त्यावेळीला मी पण लघुउद्यो भारतीचा अखिल भारतीय कार्यकर्ता असल्यामुळे समन्वय समितीच्या बैठकीत जात असे. आम्ही दोघेही एकाच रूम मध्ये राहत असू आणि त्यामुळे मी समन्वय समन्वय बैठकीमध्ये झालेल्या विषयावर माझ्या मनातले विचार मांडत असे त्यावर तो चटकन मत प्रदर्शन करत





नसे. .पण संध्याकाळी किंवा रात्री आम्ही भेटत असू तेव्हा तो त्या विषयावर चर्चा करायचे आणि समजून दिल्यासारखा विषय समजून देत असे, अशा तीन-चार समन्वय समितीच्या बैठकीला आम्ही भेटलो होतो नंतर मी लघुउद्योग भारतीचा काम थांबवल्यामुळे त्या बैठकीला गेलो नाही तो अजूनही जात असेल त्याच्या आणि माझ्या मैत्रीला आज जवळ जवळ ५० वर्ष झाली त्यामुळे इतक्या आठवणी आहेत इतके प्रसंग आहेत की ते सगळं शब्दांकन करणे मला कठीण आहे मला एक छोटी आठवण सांगायची आहे ती सतीश कसा मदत करणार होता मी बिझनेस करत असताना मुंबईला जात असे मुंबईला खरेदी करायला तसे असा एकदा गेलो असताना मला खरेदीसाठी पाच हजार कमी पडले म्हणून मी मदन दाजींना फोन केला तरी सुचवलं की तू सतीश कडे जा त्याप्रमाणे मी सतीश बँकेत गेलो आणि त्याला अडचण सांगितले त्यांनी लगेच पाच हजार रुपये काढून दिले मी त्याला सांगितले महिन्याभराने पैसे परत देतो परंतु तुम्हाला मुंबईलाच दोन महिने झाला मिळाला नाही मग मी जेव्हा मुंबईला गेलो त्यावेळेला सतीश ला पैसे दिले त्यांनी उशीर का झाला वगैरे काही विचारले नाही काम झालं ना एवढेच विचारले . माझ्यासारखी मदत तोअनेक जणांना करत असणार याची मला जाणीव होती हा मी आपला छोटासा माझा अनुभव सांगितला अशा या बहुआयामी माझ्या मित्राला त्याच्या ७५ पूर्ण त्यांनी माझ्या खूप खूप शुभेच्छा आणि त्याला खूप चांगले आयुष्य मिळावे शंभर वर्ष त्याला सामाजिक करण्याची संधी मिळावी ही परमेश्वराकडे प्रार्थना.



# श्री सतीश जी मराठे : अनुभव, ज्ञान, वाणी, व्यवहार से समृद्ध व्यक्तित्व

**हमारे साथ उनके सहवास की चार वर्षों की अवधि के दौरान मैंने उनकी बेबाक और स्पष्टवक्ता किन्तु, नरमी से पेश आने की उनकी शैली को मैं निकट से देख पाया। बैंक का संचालन, नीति विषयक निर्णय लेने की प्रक्रिया के दौरान होने वाली चर्चा, उनके अनुभव, आदि से मैं काफी कुछ सिख पाया। बैंक के निदेशक पद से मुक्त होने के पश्चात् भी सतीशजी का मार्गदर्शन हमें आवश्यकता पड़ने पर प्राप्त होता रहता है।**



नलीन वसा

श्री सतीशजी मराठे अनुभव, ज्ञान, विनीत वाणी-व्यवहार से समृद्ध व्यक्तित्व । बैंकिंग सैद्धांतिक एवं व्यावहारिक ज्ञान रखने वाले मृदुभाषी, मितभाषी, मिष्टभाषी व्यक्ति के रूप में पहली मुलाकात में हमें अपनी ओर आकर्षित कर लेने वाले सतीशजी जहाँ भी जाते हैं, अपना विशिष्ट स्थान बना लेते हैं, अपनी छाप छोड़ जाते हैं।

२०१५ से २०२१ के दौरान मुझे राजकोट नागरिक सहकारी बैंक के अध्यक्षपद का उत्तरदायित्व सौंपा गया था। उसके पूर्व श्री ज्योतीन्द्रभाई महेता बैंक के अध्यक्ष थे, और मुझ पर उपाध्यक्षपद का उत्तरदायित्व था, तब २०१४ में हमें बैंक के सुचारू संचालन के लिए बैंकिंग क्षेत्र के अनुभवी एवं परिपक्व व्यक्ति की आवश्यकता थी, ऐसे समय में बैंक और सहकार भारती के विचार-विमर्श के फलस्वरूप श्री सतीशजी को बैंक में उत्तरदायित्व सौंपने का विचार किया गया। उस समय वे सहकार भारती के अध्यक्ष थे। हम सबने सोचा, यदि सतीशजी बैंक के साथ जुड़ते हैं, तो बैंक को उनके अनुभव और ज्ञान का लाभ मिलेगा, बैंक को सुचारू रूप से चलाने में हमें सहायता होगी। वे भी बैंक की वर्तमान स्थिति से अवगत होते रहेंगे। इसी विचार के चलते हमने उनके समक्ष प्रस्ताव रखा और उन्होंने स्वीकार किया। फलतः वर्ष २०१४ से २०१९ पांच वर्षों की अवधि के लिए वे बैंक में निदेशक के रूप में उनका प्रवेश हुआ ।

केंद्र सरकार के द्वारा २०१८ में भारतीय रिज़र्व बैंक के सेन्ट्रल बोर्ड के निदेशक के रूप में उन्हें नामित किया गया और निर्धारित समयावधि के पूर्व ही उन्हें राजकोट नागरिक सहकारी बैंक का निदेशक पद छोड़ना पड़ा। परन्तु, हमारे साथ उनके सहवास की चार वर्षों की अवधि के दौरान मैंने उनकी बेबाक और स्पष्टवक्ता किन्तु, नरमी से पेश आने की उनकी शैली को मैं निकट से देख पाया। बैंक का संचालन, नीति विषयक निर्णय लेने की प्रक्रिया के दौरान होने वाली चर्चा, उनके अनुभव, आदि से मैं काफी कुछ सिख पाया। बैंक के निदेशक पद से मुक्त होने के पश्चात् भी सतीशजी का मार्गदर्शन हमें आवश्यकता पड़ने पर प्राप्त होता रहता है। बैंक के प्रति उनका समभाव और उनका सौजन्य अभी भी बना हुआ है।

\- नलिन वसा





# सतीश मराठे - हाडाचा कार्यकर्ता

**सतीशजींच्याकडे सहकाराविषयी, काही स्वतंत्र आणि निराळा असा विचार आहे. भले तो तुम्हाला पटेलच असं नाही. प्रश्न आहे तो मुलभूत आणि स्वतंत्र चिंतनाचा, तसेच वेगळ्या दृष्टीकोनाचा, जो तुम्हाला सतीशजींच्या ठिकाणी अनुभवता येतो. कार्यकर्त्यामधील गुणवत्ता अचूक हेरण, त्यानुसार त्याच्यावर एखादी जबाबदारी सोपवण, आणि अंतिमतः त्यात त्याला यशस्वी झाल्याच पहाण, हे सतीशजींच्या स्वभावाचं मी अनुभवलेल आणखीन एक वैशिष्ठ्य.**



सी ए सुधीर पंडित

मी गेली जवळ जवळ पन्नास वर्षे सतीशजींना पहातोय. अर्थात आमची घनिष्ट मैत्री अशी नाही. विद्यार्थी परिषदेची जिल्हा, प्रांतिय आणि अखिल भारतीय अधिवेशने, प्रासंगिक बैठका यावेळी ते दिसत असत. क्वचित प्रसंगी आमचेसंभाषणही होत असे. त्यांचा सर्व ठिकाणचा जबाबदार आणि उत्साही वावर मला जाणवत असे. नंतर एका अधिवेशनाच्या दरम्यान समजल की ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मुंबईतील केंद्रिय कार्यालयाचे प्रमुख म्हणजे कार्यालय मंत्री आहेत. केंद्रिय कार्यालय मंत्री आणि मुंबई स्थित कार्यालय या गोष्टीचं महत्व निराळच. मला वाटत ही जबाबदारी पार पाडतानाच त्यांच्या व्यक्तिमत्वाला प्रशासकीय कौशल्याचे घुमारे फुटले असावेत. ते अनेक वर्षे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे केंद्रिय कार्यालय मंत्री होते. कार्यालय सांभाळणाऱ्या व्यक्तीमधे मग तो स्वयंसेवक असो, कार्यकर्ता असो, किंवा व्यवस्थापक असो, निरनिराळ्या स्तरातील, वयोगटातील, निरनिराळे स्वभाव वैशिष्ठ्य असलेल्या व्यक्तींशी स्थायी ऋणानुबंध निर्माण करण्याचं कौशल्य प्राप्त होत असत. मला असंही कळलकी सतीश मराठे ही कार्यालयीन जबाबदारी बँक ऑफ इंडियातील नोकरी सांभाळून मोठ्या उत्साहाने पार पाडत असत. त्यामुळ याच मोल मोठ आहे. त्यांनी यशस्वीपणे पार पाडलेल्या या जबाबदारीमुळेच त्यांना नंतरच्या काळात संघ परिवारातील सर्व संघटनांत, सर्व स्तरावर आणि बाहेरच्या विश्वातही आनंदान स्विकारलं गेल. (This task developed in himthe quality for acceptability by others)

सहकार भारती आणि सतीश मराठे हे एक अद्वैत आहे . सतीश मराठे हे तस एका अर्थाने भाग्यवान. कारण ज्यावेळी व्यक्तीच्या जीवनाची पायाभरणी होत असते, त्याकाळात त्यांचा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी ऋणानुबंध निर्माण झाला. नुसता ऋणानुबंध निर्माण नाही झाला तर कै यशवंतराव केळकर ,कै मदनदासजी देवी, कैबाळ आपटे , आणि कैगणेश जोशी अशा दृष्ट्या शिल्पकारांच्या ते सानिध्यात आले. ज्यांच्यामुळे त्यांना संघटनेची जाण आणि दृष्टी मिळाली. सर्वसामान्य कार्यकर्त्यात मिळून मिसळून त्यांच्याशी अकृत्रिम ऋणानुबंध प्रस्थापित करणं, त्यांना मार्गदर्शन करत,त्यांचं नेतृत्व करण हे फार आव्हानात्मक असत.हे आव्हान सतीशजींनी यशस्वीपणे पेललं. याकौशल्याचा त्यांना सहकार भारतीची संघटनात्मक बांधणी करताना खुप उपयोग झाला. त्यांनी सहकार भारतींच संघटनात्मक जाळं देशभर उभारण्यात मोलाची भूमिका निभावली. सहकार भारतीला तात्विक अधिष्ठान दिलं. मात्र हे करताना त्यांनी स्वतःला इतर



कार्यकर्त्यांवर लादलं नाही. म्हणूनच ते इतरांपेक्षा निराळे पण त्याचवेळी सर्वसामान्य कार्यकर्त्यामधलेच वाटतात.

ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दात सांगायच झाल तर.......... मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लवावे । अलौकिक नोहावे । लोकाप्रती।।- म्हणजे प्रवाहात राहून प्रवाहाला दिशादेण नव्हे काय ?

सतीशजींचा भारताबाहेरील जन्म , इंग्रजी माध्यम ातल शिक्षण. मुंबईतील दादर सारख्या ठिकाणी वास्तव्य, बँक ऑफ इंडिया मधील नोकरी, हे सगळ सकृत दर्षनी सहकार चळवळीशी नाळ जोडण्यास कठीण वाटणार. पण एकदा संघ परिवाराच्या वरिष्ठ नेतृत्वानं सहकार क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, सतीशजी जिद्दीने कामाला लागले. ठरलेल्या योजने नुसार सुरुवातीला डोंबिवली नागरी सहकारी (DNSB) बँकेत महा -व्यवस्थापक तर जनकल्याण सहकारी बँक (चेंबुर) इथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्य करते झाले. त्यांची जनकल्याण सहकारी बँकेतील कारकीर्द विशेष उल्लेखनीय. सतीशर्जीनी सहकारी बँकेच्या कार्यापद्धतीच्या मर्यादा लक्षात घेऊन, कार्यक्षमतेने बँक चालवली आणि आदर्शाचे मापदंड निर्माण केले.

सतीशजींच्याकडे सहकाराविषयी, काही स्वतंत्र आणि निराळा असा विचार आहे. भले तो तुम्हाला पटेलच असं नाही. प्रश्न आहे तो मुलभूत आणि स्वतंत्र चिंतनाचा, तसेच वेगळ्या दृष्टीकोनाचा, जो तुम्हाला सतीशजींच्या ठिकाणी अनुभवता येतो.

कार्यकर्त्यामधील गुणवत्ता अचूक हेरण, त्यानुसार त्याच्यावर एखादी जबाबदारी सोपवण, आणि अंतिमतः त्यात त्याला यशस्वी झाल्याच पहाण, हे सतीशजींच्या स्वभावाचं मी अनुभवलेल आणखीन एक वैशिष्ठ्य.

सतीशजींचा मुळचा ऋजु स्वभाव. अल्पकालीन आणि तत्काळ होणाऱ्या फायद्यापेक्षा संस्थेच किंवा संघटनेच दीर्घकालीन हित आणि पर्यायाने सहकार चळवळीच हित हादृष्टीकोन ते नेहमी बाळगतात. बँकिंग क्षेत्रात त्यांना क्वचित प्रसंगी अपयशही अनुभवाव लागल, टीकाही सहन करावी लागली. पण हे सर्व हलाहल सतीशजीनी मोठ्या धैर्याने पचवलं. नैराष्येची मरगळ झटकून, फिरून अधिक उत्साहने, सहजतेने आणि तडफेने ते कामाला लागले. सहकारी बँकांबद्दल संवेदनाहीन आणि ताठर दृष्टीकोन असणाऱ्या रिझर्व बँकेच्या संचालक पदावर राहून सहकारी बँकांचेहित जपताना सतीशजीची किती कुचंबणा होत असेल याची मी कल्पना करू शकतो.

कार्यकर्त्याने निरपेक्ष भावनेन सतत काम करायचं असत ते ही अव्याहत पणे,

कार्यमग्नता जीवन व्हावे

म्रुत्यु ही विश्रांती

अशीच संघाच्या मुशीतून तयार झालेल्या कोणत्याही स्वयंसेवक कार्यकर्त्याची मनोधारणा असते. सतीशजी त्याला अपवाद नाहीत. त्यांची पंचाहत्तरी साजरी होण ही आनंदाची बाब आहे. सतीशजींच्या बाबतीत वय हा केवळ आकडा आहे. खर सांगायच तर त्यांचा उत्साह हातीशीतला आहे आणि अनुभव पंचेचाळीस वर्षाचा. पंचाहत्तर वर्षाची विभागणी हीअशी आहे.

For him Age is just a number. Seventy Five years means thirty years of age and Forty Five years of experience, dedication and devotion.

त्यांना उत्तम आरोग्य ,दीर्घायुष्यलाभो आणि त्यांच्या हातून सहकारासाठी भरीव योगदान घडो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**सी ए सुधीर पंडित**

माजी संचालक

जनता सहकारी बँक ली, पुणे.

माजी प्रशासक

रुपी को ऑप बँक ली पुणे





# निष्कलंक चारित्र्य

**सातीशजींचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कमालीचा साधेपणा. आपल्या पदाचा जराही अहम:भाव न ठेवता आपल्या परिचिताच्या घरी अगदी सहजपणे जातात प्रसंगी राहतात सुद्धा. या वयातील त्यांचा उत्साह निश्चितच वाखाणण्याजोगा आहे.**



**सुधाकर कुलकर्णी**

सातीशजींचा व माझा प्रथम परिचय १९९० साली माझी बदली त्यावेळच्या युनायटेड वेस्टर्न बँकेच्या डोंबिवली शाखेस वरिष्ठ शाखा व्यवस्थापक म्हणून बदली झाल्यावर झाला . ते त्यावेळी डोंबिवली नागरी सहकारी बँकेत महाव्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. त्यावेळी डोंबिवली नागरी सहकारी बँकेचा डोंबिवलीतील बँकिंग व्यवसाय प्रमुख राष्ट्रीयकृत बँकांच्या बरोबरीचा होता , याचे श्रेय प्रामुख्याने सतीशजीनाच जाते. डोंबिवली नागरी बँक सहकार क्षेत्रात नावारूपाला आल्यावर त्यांनी पुढे चेंबूर येथील जनकल्याण सहकारी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारली आणि तेथूनच २००२ साली त्यांची त्यावेळच्या महाराष्ट्रातील व देशातील खाजगी क्षेत्रात अग्रणी असलेल्या युनायटेड वेस्टर्न बँकेच्या चेअरमनपदी नियुक्ती झाली. खरे तर त्याआधी मी युनायटेड वेस्टर्न बँकेतून स्वेच्छा निवृत्ती घेतली होती असे असताना सुद्धा त्यांचा माझा नियमित संपर्क होता व तो आजतागायत आहे. ते जरी शेवटी व्यापारी बँकेत आले तरी त्यांचा मुळचा पिंड सहकाराचाच कारण त्यांचे मूळकार्यक्षेत्र सहकार, सहकार आणि सहकारच होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ते सहकार भरतीचे संस्थापक होत व त्यांच्या अथक परिश्रमाने सहकार भारतीने सहकार क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याची योग्य दखल घेऊन केंद्र सरकारने त्यांची रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय मंडळाच्या संचालक पदी नियुक्ती केली आहे. विशेष म्हणजे केंद्रात सहकारासाठी प्रथमच स्वतंत्र खाते व सहकाराची पुरेपूर जाण असणाऱ्या सातीशजींची रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय मंडळाच्या संचालक पदी नियुक्ती हा एक दुग्धशर्करा योगच आहे.

सातीशजींचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कमालीचा साधेपणा. आपल्या पदाचा जराही अहम:भाव न ठेवता आपल्या परिचिताच्या घरी अगदी सहजपणे जातात प्रसंगी राहतात सुद्धा. या वयातील त्यांचा उत्साह निश्चितच वाखाणण्याजोगा आहे. आजही भारतात सर्वत्र सहकार क्षेत्रातील विविध उपक्रमांना मार्गदर्शन करण्यासाठी सतत प्रवास चालू असतो, यातून त्यांची सहकारा विषयी प्रखर निष्ठा दिसून येते.बँकिग तसेच सहकार क्षेत्रात इतक्या उच्च पदावर राहून सुद्धा निष्कलंक चारित्र्य असणारी सतीशजी सारखी व्यक्ती अभावानेच दिसून येते.

मला खात्री आहे कि यापुढे ही त्यांचे कार्य असेच अव्याहतपणे चालू राहील व त्यांच्या मार्गदर्शनात सहकार क्षेत्र आणखी भरभराटीस येईल. त्यांच्या हिरकमहोत्सवी समारंभास मनस्वी शुभेछा त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो ही शुभकामना.



# सहकारयोगी

**श्री. सतीशजी मराठे यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनाखाली माझ्या लेखणीला ताकद आली. भरभरून बँकिंग मी लिहायला लागले आहे. सतीशजी मनापासून धन्यवाद! आपले आभार! कायम कृतज्ञ आहे. सहकारयोगी अशी उपाधी त्यांना दिली पाहिजे असे सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य आहे.**



**वंदना धर्माधिकारी**

सहकार क्षेत्रामधील अग्रगण्य व्यक्तिमत्व, सहकारी बँकाचे मार्गदर्शक, सहकाराप्रती आत्मीयता असलेली व्यक्ती म्हणून प्रथम समोर येतो तो श्री. सतीशजी मराठे यांचा चेहरा. १९७९ पासून देशभर विस्तारलेल्या 'सहकार भारती'चे सतीशजी संस्थापक सदस्य आहेत. ऑगस्ट २०१८ पासून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळात ते कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पपूर्व बैठकांमध्ये सहकार क्षेत्राचे प्रतिनिधित्व मराठेसर करीत आहेत. 'सहकारातून समृद्धी' ब्रीदवाक्य घेऊन प्रथमच जुलै,२०२१ मध्ये केंद्रीय सहकार मंत्रालयाची निर्मिती झाली, यामध्ये त्यांचा मोलाचा सहभाग आहे. तसेच 'बिना संस्कार नाही सहकार, बिना सहकार नाही उद्धार' अशी विचारधारा असणारी संस्था सहकार भारती होय. त्यांच्या ७५ वर्षपूर्तीच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अमृत महोत्सवी वर्षोत्तर सुख, समृद्धी, आरोग्य यासांठी मनापासून शुभेच्छा!!

एका सहकार दिग्गज व्यक्तीबद्दल चार शब्द लिहिण्यासाठी मला सांगण्यात आले. त्याबद्दल अमृतपत्रिका आयोजक, माझे स्नेही सहकार सुगंधचे संपादक श्री. भालचंद्र कुलकर्णी यांचे मी आभार मानते.

मी, सौ. वंदना विजय धर्माधिकारी एक बँकर, बँक ऑफ इंडिया मध्ये २८ वर्षे नोकरी करून २००० साली स्वेच्छानिवृत्ती घेऊन लगेचच लेखणी हाती आली. योगायोगाने बँकिंगची लेखिका अशी माझी ओळख झाली. लेखणीमुळे अनेक लोकांशी संपर्क वाढला, मैत्रीचे नाते प्रस्थापित झाले. काही अडचण आली, माहिती लागली, मार्गदर्शन हवे तर हक्काने फोन करायला काही माणसे भोवती आहेत. त्यातीलच एक सतीश मराठेसर. मी राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी केली, त्यामुळे सहकारी बँकिंगशी थोडासाच संबंध आला. त्याच सहकारी बँकांवर देखील मी आता लिहिते, नुकतेच १० जानेवारी २०२५ रोजी 'बेस्ट सेलर - मैत्री बँकिंगशी - सुधारित १३ वी आवृत्ती - सकाळ प्रकाशन' - हे माझे पुस्तक प्रकाशित झाले. सतीशजींच्या शुभहस्ते एका आवृत्तीचे प्रकाशन झाले, एका आवृत्तीला त्यांची प्रस्तावना आहे, या १३ व्या आवृत्तीमध्ये त्यांच्या शुभेच्छा आहेतच.

२०१३ अखेरपर्यंत पुस्तकाच्या ६ आवृत्त्या झाल्या होत्या. सातवी आवृत्ती नाशिक येथे 'सहकार भारती अधिवेशनात' प्रकाशित करायचे असे सतीशजी आणि भालचंद्रजी दोघांनी मला सांगितले. सुधारित आवृत्तीचे काम चालूच होते. फेब्रुवारी २०१५ अखेरीस सतीशजींचा फोन आला, ''मैत्री बँकिंगशी हिंदी केले आहे का? नसेल तर लगेच करायला घ्या. मला ते २० मे पर्यंत पूर्ण पुस्तक पाहिजे.

३१ मे,२०१४ रोजी नाशिक येथे मराठीची ७ वी आवृत्ती आणि बरोबर ८ दिवसांनी ८ जून २०१४ रोजी अहमदाबाद येथे 'अहमदाबाद सहकारी बँक्स फेडरेशन' यांच्या 'सहकार सेतू नेक्स्ट जनरेशन' कार्यक्रमात 'मित्रता बँकिंग से' पुस्तक लोकार्पण सोहळा झाला. फेडरेशन अध्यक्ष श्री. ज्योतिन्द्रजी मेहता यांनी उत्तम सहकार्य दिले. स्वप्नातही कधी आले नाही अशा भव्यदिव्य व्यासपीठावर आरबीआय डेप्युटी गव्हर्नर आर गांधी यांच्या शुभहस्ते पुस्तक प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन गुजरात राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्री आनंदीबेन पटेल यांच्या शुभहस्ते झाले होते. गुजरात राज्यातील बँकिंग आणि फायनान्स यामधील दिग्गज लोकांच्या उपस्थितीत हिंदी पुस्तक अवतरले. याचे सर्व श्रेय श्री सतीश मराठे यांना आहे. नाहीतर मी कुठली जाणार पुस्तक घेऊन अहमदाबादला? असो.

त्याच कार्यक्रमात पुढील भागात माझ्या शेजारी आरबीआयचे एक्झीक्युटीव्ह डायरेक्टर श्री. दास बसले होते. त्यांनी हे पुस्तक आम्हाला गुजरातीत द्या, असेच सांगितले. बरोबर ११ महिन्यांनी मैत्री बँकिंगशी च्या ८ व्या आवृत्तीचे गुजराती रुपांतरीत पुस्तक 'बँकिंग मैत्री' तयार झाले. अहमदाबादला जाऊन ८ मे २०१५ रोजी फेडरेशनला पुस्तक सुपूर्त केले. त्यांनी पुस्तकाची एक आवृत्ती घेतली. यामागे देखील श्री. सतीश मराठे यांनाच श्रेय जाते. असे मोलाचे सहकार्य माझ्या लेखणीसाठी मिळाले हे भाग्य आहे.

श्री. सतीशजी मराठे यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनाखाली माझ्या लेखणीला ताकद आली. भरभरून बँकिंग मी लिहायला लागले आहे. सतीशजी मनापासून धन्यवाद! आपले आभार! कायम कृतज्ञ आहे. सहकारयोगी अशी उपाधी त्यांना दिली पाहिजे असे सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य आहे. त्यांना त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षोत्तर आयुष्यात उत्तम आरोग्य लाभो, असेच देशाप्रती सहकाराप्रती कार्य त्यांच्या हातून होवो. त्यासाठी मी व माझे पती विजय आम्हा दोघांकडून शुभेच्छा!

**- वंदना धर्माधिकारी**
Vandana10d@yahoo.co.in
M-+91 9890623915



# भारताच्या सहकारी क्षेत्राला आकार देणारे बँकिंग दूरदर्शी प्रमुख नेतृत्व

**ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करत कार्यरत असल्या पाहिजेत असे श्री मराठी यांचे सततचे म्हणणे होते त्यामुळेच बँकेचे संगणकीकरण करत असतानाच ॲम्बिएस सुधारण्यावर भर देत ग्राहक सेवा सुधारणे अंतर्गत जनकल्याण बँकेच्या सर्व शाखांच्या वेळा या सकाळी आठ ते सायंकाळी आठ वाजेपर्यंत सुरू करण्याचा एक धडाकेबाज निर्णय श्री मराठे साहेबांनी घेऊन सहकार क्षेत्रामध्ये इतिहास घडविला.**



संतोष केळकर

संघ परिवारातील सहकारी बँकांमध्ये गुणात्मक व दर्जात्मक सुधार व्हावा तसेच एकूणच सहकार क्षेत्रामध्ये काम करण्याचे निश्चित झाल्यावर माननीय श्री सतीश मराठे यांनी आधी डोंबिवली नागरी सहकारी बँक व नंतर जनकल्याण बँकेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर काम करण्यास सुरुवात केली. बँकेत कार्यरत असताना पेन्शन सुरू झाल्याचे निश्चित झाल्यावर आता बँकांमधील लांब पल्ल्याची नोकरी नको असे ठरवून सहकारी बँकांमध्ये म्हणून कार्यरत असणारी अनेक अधिकारी मंडळी आपणास पाहता येतील परंतु अवघ्या देशातील सहकार क्षेत्रातील सर्वांगीण सुधारणांचे एक मोठे स्वप्न घेऊन कार्यरत असणाऱ्या श्री मराठ्यांनी हे ठरवून केलेले पदार्पण होते त्यासाठीचा त्यांचा हा मोठा त्याग होता एक समजून अंगीकारलेला एक वसा होता.

श्री मराठे यांनी जनकल्याण बँकेचा कार्यभार पाहण्यास सुरुवात केली तेव्हा बँकेच्या सात शाखा होत्या त्या आतापर्यंत २५ पर्यंत पोहोचल्या आहेत तर ठेवींचा पहिला मैलाचा दगड म्हणजे शंभर कोटींच्या ठेवी पार करून जनकल्याण बँकेला रिझर्व बँक ऑफ इंडिया चा शेड्युल बँकेचा दर्जा प्राप्त झाला आहे यासाठी श्री मराठे साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन व ग्राहक, कर्मचारी व हितचिंतकांचा प्रत्यक्ष सहभाग पाहण्यास मिळतो.

सहकारी बँका या व्यापारी बँकांच्या धोरणानुसार परंतु ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करत कार्यरत असल्या पाहिजेत असे श्री मराठी यांचे सततचे म्हणणे होते त्यामुळेच बँकेचे संगणकीकरण करत असतानाच ॲम्बिएस सुधारण्यावर भर देत ग्राहक सेवा सुधारणे अंतर्गत जनकल्याण बँकेच्या सर्व शाखांच्या वेळा या सकाळी आठ ते सायंकाळी आठ वाजेपर्यंत सुरू करण्याचा एक धडाकेबाज निर्णय श्री मराठे साहेबांनी घेऊन सहकार क्षेत्रामध्ये इतिहास घडविला. ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर व्यक्त करीत त्यांच्या ठेवींच्या दरामध्ये एक टक्का अधिक व्याज देण्यारी जनकल्याण बँक ही देशातील एक अग्रगण्य बँक होती व अशा प्रकारची सुविधा सुरू करणारी ती पहिलीच बँक आहे.

बैकेची जाहिरात करतानादेखील श्री मराठे साहेबांनी अनोखा मार्ग अवलंबला. सकाळच्या मोक्याचे वेळी जनकल्याण बँकेची विश्वासाने नी : श्वास टाकावा अशी बँक ही जाहिरात रेडिओ वर लावून जनकल्याण बँक सर्वांच्या मुखी रुजविली. महाराष्ट्रातील अनेक सहकारी पत पेढ्यांना व मुंबई बाहेरील सहकारी बँकांना क्लिअरिंग, foreign exchange व इतर माध्यमातून सहकार्य करण्याचे काम श्री मराठे यांच्या व्यक्तिगत संबंधातून व पुढाकारातून जनकल्याण बँकेने इतरांसाठी उपलब्ध करून दिले होते.



संघ परिवाराशी श्री मराठी यांचे व्यक्तिगत व पर्यायाने बँकेचे असलेले सौहार्दाचे संबंध नेहमीच परस्परांना सहकार्य करीत आले आहेत. कारगिल युद्धानंतर पंतप्रधान निधीला रुपये ७५ लाखांची भरघोस देणगी देऊन जनकल्याण बँकेने आपली सामाजिक जबाबदारी देखील यथोचित पार पाडली होती असे म्हणता येईल.

**भूमिका आणि उपलब्धी**

१. संचालक, आरबीआयचे केंद्रीय मंडळ (२०१८पासून कार्यरत)

२. २०१८ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) चे अर्धवेळ, अधिकृत संचालक म्हणून नियुक्ती.

३. सहकारी बँकिंग क्षेत्रातील धोरणात्मक रचना, नियामक चौकट आणि आर्थिक स्थिरतेवर त्यांनी आरबीआयला वेळोवेळी सल्ला दिला.

४. शहरी सहकारी बँकांच्या (यूसीबी) प्रशासनाच्या समस्या सोडवण्यात आणि नियामक स्पष्टतेसाठी हिरीरीने महत्वाची भूमिका बजावली.

सहकारी बँकांमध्ये त्यांच्या डिजिटल क्षमता मजबूत करण्यासाठी तांत्रिक परिवर्तनासाठी आरबीआयच्या प्रयत्नांना पाठिंबा दिला व त्याच्या पूर्तेसाठी ते सदैव आग्रही राहिले.

आरबीआय आणि राज्य सरकारांमधील सुव्यवस्थित पर्यवेक्षणाच्या उद्देशाने दुहेरी नियामक चौकटीवरील चर्चेत त्यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे यशस्वी योगदान दिले.

तसेच श्री सतिशजिंनी सहकारी बँकेत विवेकी मानदंड, भांडवल पर्याप्तता आणि जोखीम व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी काम केले.

आज माननीय श्री सतीश मराठे साहेब वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहेत. त्यांचा आत्तापर्यंताचा उत्साह पाहता यापुढील अनेक वर्षे ते सहकार क्षेत्रामध्ये असे उत्साहाने कार्यरत राहणार आहेत असे माझे ठाम मत आहे त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्याची व त्यांच्या बहुमोल विचारांची देशाला व पर्यायाने सहकार क्षेत्राला लाभ होवो ही सदिच्छा!



# सहकारातले दिग्गज



**बँकिंग आधुनिकेकडे जात असतानाही स्पर्धेच्या आजच्या युगात सहकाराचे महत्त्व ज्यांनी आम्हाला रुजवलं अशा सहकारातल्या दिग्गजा पैकी एक म्हणजे श्री सतीश मराठे साहेब यांचा नेहमी उल्लेख असतो.**



**मधुसूदन पाटील**

आज खरच खूप आनंद होत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक तथा सहकार भारतीचे संस्थापक सदस्य श्री. सतीश जी मराठे साहेब यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त हा लेख लिहिताना माझ्या वैयक्तिक आयुष्यातील अविस्मरणीय लेख असेल असं मला वाटतं. त्यांचा ७५वा वाढदिवस परंतु ७५ तास सुद्धा एकच एका ठिकाणी किंवा एका जागेत प्रवास केले असतील असं मला तरी वाटत नाही, कारण नेहमी प्रवासात असून सहकाराच्या माध्यमातून देशाची सेवा करणारे आपले सर्वांचे मार्गदर्शक श्री. सतीशजी मराठे साहेब.

बऱ्याच वेळेस श्री. सतीशजी मराठे साहेब यांना कामानिमित्त त्यांच्या डोंबिवली येथील निवासस्थानी आम्ही बँकेचे संचालक किंवा संघटनात्मक काम म्हणून सहकार भारतीच्या कामानिमित्त कधीही त्यांच्या निवासस्थानी आम्ही भेटतो. त्यांच्यामध्ये नेहमी उत्साह व आपुलकी व कार्यकर्त्याला सन्मान कसा दिला पाहिजे हे श्री. सतीश जी मराठे साहेबांना पाहिल्यानंतर कळतो. त्यामध्ये अजून एक सांगायचं म्हटलं तर भेटल्यानंतर ते कधीही काल रात्री आलो किंवा आज सकाळी पोहोचलो उद्या दुपारी निघायचं आहे म्हणजे नेहमी पायाला भिंगरी लावून प्रवास करणारा कार्यकर्ता या वयात फिरतो म्हणजे आपल्याला सर्वांना ही प्रेरणा असे म्हणावे लागेल.

बँकिंग आधुनिकेकडे जात असतानाही स्पर्धेच्या आजच्या युगात सहकाराचे महत्त्व ज्यांनी आम्हाला रुजवलं, अशा सहकारातल्या दिग्गजांपैकी एक म्हणजे श्री. सतीश मराठे साहेब यांचा नेहमी उल्लेख असतो.

बँकेचे संचालक म्हणून वेगवेगळ्या शाखांच्या जबाबदाऱ्या सांभाळताना संघटन कौशल्य, व्यवसाय वृद्धी व ग्राहकभिमुखता जोपासण्याचे ज्ञानाचे मार्गदर्शन श्री. सतीशजी मराठे साहेब आम्हाला वेळोवेळी करत असतं. सहकारातला दिग्गज व्यक्तीमत्त्व, सहकारातले गाढे अभ्यासक श्री. सतीशजी मराठे साहेब यांच्यासोबत आमच्या सर्व कार्यकर्त्यांना व सहकारात काम करणाऱ्या सर्व सहकारी मंडळींना संघटनेत काम करायला अनेकदा संधी मिळाली व त्यातून आम्ही त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकलो सुद्धा.

कल्याण जनता सहकारी बँक, सहकार भारती कोकण नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि . मुंबई असेल या सर्व सहकार क्षेत्रात काम करत असताना मराठे साहेब आमच्यासाठी ज्ञानाचे दीपस्तंभ आहेत आणि असतील.

अनुभव सिद्ध सहकारातील व्यक्तिमत्त्व म्हणून माझ्यासाठी श्री. सतीशजी मराठे साहेब नेहमी मार्गदर्शक आहेत. अशा मार्गदर्शकांची अमृत महोत्सव ७५वा वाढदिवस या वाढदिवसानिमित्त त्यांना खूप खूप शुभेच्छा...

**- मधुसूदन रामदास पाटील**
संचालक - दि कल्याण जनता सहकारी बँक लि .
संचालक - महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि.मुंबई
उपाध्यक्ष - सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश





# झाले बहु होतील बहु, परंतु या सम हाच!

**कार्यकर्ता कसा तयार करावा ते शिकावे साहेबांकडून. तो पत्रव्यवहारात, संवाद साधण्यात, संपर्क करण्यात पारंगत झाला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. एखादा कार्यक्रम किंवा सहकार भारतीची बैठक असेल तर पत्रव्यवहार, फोनवरून संपर्क साधून पाठपुरावा करून जास्तीत जास्त कार्यकर्ते बैठकीस कसे उपस्थित राहतील असे प्रयत्न करायला ते सांगत असत.**



**उदय पेंडसे**

जानेवारी, १९८७ चा दुसरा आठवडा असावा. मी तेव्हा संघाचा आदर्श नगर मंडल कार्यवाह म्हणून काम करत होतो. एक दिवस मी सायकल दुरुस्तीला नेत असताना वाटेत, आमचे त्यावेळचे परळ भाग कार्यवाह चंद्रकांत चव्हाण भेटले. ते म्हणाले, ''अरे आपली एक सहकार भारती म्हणून संस्था आहे. त्यांना कार्यालयात काम करण्यासाठी एक मुलगा हवा आहे. १२ वी झालेला, आणि मराठी पत्रव्यवहार करता यायला हवा अशी अपेक्षा आहे. कोणी असेल तर सांग. दादरमध्ये आपल्या नाना पालकर कार्यालयातच काम करायचं आहे. साधारणपणे ₹ ५००/- पगार देतील. सतीश मराठे म्हणून त्या संस्थेचे काम बघतात.''

मी त्यांना म्हटलं, तुम्ही जी अपेक्षा व्यक्त केली आहे, त्या मी पूर्ण करतो आहे, तर मीच त्यांना भेटलो तर चालेल का? कारण तेव्हा मी कॉलेज करून, बॅलार्ड पियर येथील एका युनिटेक्स प्रा. लि. या कंपनीत ₹ १४/- रोज या वेतनावर काम करत होतो. शनिवार - रविवार सुटी. त्यामुळे जेमतेम ₹३००/- पगार मिळत असे. त्यावर चंदू चव्हाण यांनी तुला भेटायला काहीच हरकत नाही असं सांगितलं.

सतीश मराठे यांना दोन वेळा भेटण्याचा प्रयत्न केला. पण ते शनिवार/रविवारी प्रवासात असल्याने भेट होऊ शकली नाही. अखेर एक दिवस भेट झाली. माझी, घरची चौकशी केली. पगार ₹ ५००/- दुपारी १ ते ९ कामाची वेळ. मंगळवार साप्ताहिक सुटी या अटी सांगितल्या आणि कधी जॉईन करशील असं विचारलं. मी ''लगेच'' असं उत्तर दिलं. ते त्यांना आवडलं, अर्थात ते त्यांनी मला नंतर सांगितलं.

रविवार, दि. २ फेब्रुवारी १९८७ हा कामावर जॉईन व्हायचा दिवस ठरला. आधी त्यांच्या घरी गेलो. तो दिवस म्हणजे मुग्धाचा वाढदिवस. रविवार दुपारची वेळ, घरात पुरणपोळीचा घमघमाट पसरलेला. माझ्या सारख्याने वामकुक्षीच घेतली असती. पण साहेबांना विश्रांती ठाऊकच नाही. त्या दिवशीचा प्रसंग अजूनही डोळ्यासमोर लख्ख दिसतोय. मुलीचा वाढदिवस, रविवार. सगळे घरात असताना साहेब कार्यालयात निघालेले. वहिनी साहजिकच नाराज झालेल्या. साहेबांनी वहिनींच्या डोक्यावर हात ठेवला व हसत हसत म्हणाले शांत - शांत ४ वाजेपर्यंत नक्की येईन.

नाना पालकर या संघ कार्यालयात, एका खोलीत सहकार भारतीसाठी एक टेबल ठेवण्याइतकीच जागा दिली होती. आम्ही त्या कार्यालयात आलो. साहेबांनी पोस्ट कार्ड आणली होती. मला मसुदा सांगितला आणि पत्र लिहायला सांगितले. मी लिहीलेलं एक पत्र वाचून बघितलं, काही सुधारणा सुचविल्या



व अशी १५-२० कार्यकर्त्यांचे पत्ते सांगून पत्र लिहायला सांगितली. पत्र वाचून त्यावर सह्या केल्या. ती पत्र लवकर मिळावीत म्हणून ही पोस्ट कार्ड दादर टी.टी. च्या पोस्टात टाकायच्या सूचना दिल्या. त्यावेळी, कॉम्प्युटर तर दूरच टायपिंग मशिनही नव्हते. सहकार भारतीकडे तेव्हा फारसे पैसे ही नसायचे, त्यामुळे पैसे वाचवण्यासाठी पोस्ट कार्ड द्वारे पत्रव्यवहार केला जायचा. साहेब स्वतःच्या खिशातून आधी पैसे खर्च करायचे व सहकार भारतीच्या खात्यात पैसे जमा झाले की मग झालेला खर्च सांगून पैसे घ्यायचे.

